संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 2 | Issue : 4 | Marathi Monthly | Thane, 1 October 2024 to 31 October - 2024 | Pages 16 | Price : 10/-

# मराठी माणसाच्या फाजिल उत्सवप्रियतेमुळेच, शिवबा-संतांच्या महाराष्ट्राची लालकाळी माती, मराठी-मुठीतून निसटतेय आणि गुजराथी-मुठीत स्थानापन्न होतेय !!!


**ही असली विविध 'उत्सव-मंडळं', मंडळं नसून भोळसट जनतेला, जीवनमरणाच्या प्रश्नांपासून जाणिवपूर्वक दूर नेत, आत्मग्लानीत ढकलणारी (तथाकथित हिंदुत्ववादी) भाजपवाल्यांची बनावट 'कमंडलं' आहेत. ती मराठी-मुलांना अभ्यासापासून दूर नेणारी आणि 'सैराट' होण्याला प्रोत्साहन देणारी आहेत...हे आम्ही मराठी-माणसं कधि ध्यानात घेणार आहोत?**




...या 'अतिरेकी' (हो, हे नक्षलवादी किंवा काश्मीरच्या आतंकवाद्यांपेक्षा कैकपटीने अधिक घातकी दहशतवादी किंवा अतिरेकी आहेत) **श्रीमंत गुजराथी-भाषिक भांडवलदारांकडून, अवघा महाराष्ट्र केव्हाचाच लुटला-लुबाडला-ओरबाडला जातोय...पण, या असल्या घातकी उत्सव-मंडळांमुळे व फाजिल उत्सवप्रियतेमुळे; तसेच, बेगडी-बनावट धार्मिकतेमुळे...महाराष्ट्राची साधनसंपन्न 'मुं.ठा.पु.रा.ना.' (मुंबई, ठाणे, पुणे, रायगड, नाशिक-नागपूर) ही प्रमुख शहरं व महाराष्ट्राची ७५%हून अधिक धनसंपदा, गुजराथी-भाषिक भांडवलदारांच्या घशात गेलीय...शिवबा-संतांच्या महाराष्ट्राची लालकाळी माती मराठी-मुठीतून निसटतेय आणि गुजराथी-मुठीत जाऊन स्धानापन्न होतेय...** ते मराठी माणसा, तुझ्या ध्यानी येत नाहीये! ते तसं व्हावं, घडत रहावं...म्हणूनच ही मंडळं अशा भांडवलदारांकडून आणि अमिताभ बच्चन, सचिन तेंडुलकर वगैरे ग्लॅमरस-व्यक्तित्वांच्या भेटीतील जाहिरातबाजीतून व मोठी आर्थिक मदत करुन जगवली जातात, वाढवली जातात!!

मराठी माणसा...मराठी तरुणा, ज्यादिवशी तू, या अशा सार्वजनिक मंडळांवर बहिष्कार घालून अंतर्यामी स्वहिताची व मराठी-समाजहिताची खरीखुरी जागृती पैदा करशील...गावागावात **"एक गाव, एक गणपती" प्रथा राबवून गावागावातील सगळा 'मराठी राडारोडा' एकवटवशील'...तेव्हा आणि तेव्हाच, तुझ्या आर्थिक-उन्नयनाचा, शाश्वत सुखसमाधानाचा...**पृष्ठ क्र. २ वर

## अंतरंग



"लालबागचा राजा आणि अनंत अंबानींनी दान केलेला सोन्याचा मुकूट"....
...राजन राजे
पृष्ठ क्र. ३



'बदला पुरा', अशा देवाभाऊच्या यूपी-स्टाईल बॅनरबाजीचा 'हिसाब पुरा'....
...राजन राजे
पृष्ठ क्र. ९

हरियाणानंतर छाती बनवेगिरी करण्यासाठी तेथे भाजपाचे 'विकृत' राजकारण चालू आहे!
...विजय घोरपडे
पृष्ठ क्र. ११



माझे गुरूदेव!
डॉ. रुपेश पाटकर
पृष्ठ क्र.१३

# राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक आरोग्याच्या आसाला भिडलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....



एकटा राहुल लढतोय, प्रियंका गांधी लढतेय...राष्ट्रीय स्तरावर पवन खेरा, सुप्रिया स्निनेट, जयराम रमेश, कुमार केतकर यांच्यासारखे काही काँग्रेस नेते जीवाच्या कराराने लढतायत...पण, ठाणे-मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात पहावं, तर सगळ्याच काँग्रेस नेत्यांच्याबाबत अगदी 'आनंदीआनंद' आहे. फारसे हातपाय न हलवताच राहुल गांधींच्या पुण्याईवर निवडणुका जिंकायच्या आणि 'महाविकास आघाडी'ची सत्ता भोगायची, अशी स्वप्न पहाण्यात ते मश्गुल आहेत!

महाराष्ट्रापुरतं बोलायचं तर, शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे, ज्यापद्धतीने मोदी-शाह भाजप सरकार आणि संघवाल्यांना थेट नेमकेपणाने अंगावर घेतायत, त्यांच्यावर मर्मभेदक प्रहार करतायत... त्याच्या जवळपासदेखील काँग्रेसवाल्यांचा राजकीय प्रचाराचा 'मारा' दिसत नाही. ते अजूनही 'राजकीय-फोटोसेशन' करण्यातच दंग आहेत...एकूणच राहुल गांधी व उद्धव ठाकरे यांची 'HardPower' आणि उर्वरित काँग्रेस-शिवसेनावाल्यांची 'SoftPower', असा हा विचित्र, दिशा हरवत चाललेला राजकीय-लढा दिसतोय!

तेव्हा, सगळ्यांनाच विचार करायला भाग पाडणारा विश्वास उटगी यांचा व्हिडीओ, जरुर पहा....

आयसीआयसीआय बँक व्यवस्थापन, अमेरिकेच्या भांडवल-बाजार नियामक संस्थेला (The Securities and Exchange Commission...SEC) माधवी बूचला ICICIकडून मिळालेल्या संपूर्ण आर्थिक-लाभांची माहिती देते...पण, भारतातल्या तशीच यंत्रणा असलेल्या SEBI ला मात्र परिपूर्ण माहिती देत नाही,

सरकार हर्षद मेहता-केतन पारेख प्रकरणाप्रमाणे 'संयुक्त संसदीय समिती' (Joint Parliamentary Committee...JPC) हिंडेनबर्ग-अदानी आणि आता 'सेबी'च्या प्रमुख माधवी बूच यांच्यसंदर्भात नेमत नाही, ''भारतात जातीयजनगणना हवी किंवा नको'' यावर नेमकेपणाने भाष्य न करणारे (पूर्वी तर स्पष्टच विरोध दर्शवला होता) आणि बांगलादेशी हिंदूंबद्दल 'नक्राश्रू' ढाळणारे; पण, इथे भारतात गुलामगिरी व नवअस्पृश्यता भोगणाऱ्या ९९.९९% हिंदू कंत्राटी कामगार-कर्मचारीवर्गाबद्दल 'ब्र' न काढणारे...रा.स्व. संघाचे मोहन भागवत, आर्थिक-घोटाळ्यात अडकलेल्या गौतम अदानीला मात्र, लागलीच सुस्पष्ट पाठिंबा जाहीर करतात...याचा नेमका काय अर्थ लावायचा?

...या सर्व राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक आरोग्याच्या आसाला भिडलेल्या प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी विश्वास उटगी तसेच, रवीश कुमार, दिनेश गोस्वामी, 4pmचे संजय मिश्रा, पुण्यप्रसून बाजपेयी, अशोक वानखेडे, दीपक शर्मा, अभिषेककुमार वगैरेंचे जमतील तसे व्हिडीओ जरुर पहा आणि देशात आर्थिक-घोटाळ्यांचा काय नंगानाच चाललाय, तो जबाबदार नागरिक म्हणून जाणून घ्या...धन्यवाद!

*...राजन राजे*

## फाजिल उत्सवप्रियतेमुळे, शिवबा-संतांच्या महाराष्ट्राची लालकाळी माती...

...पृष्ठ क्र. १ वरुन

**दरवाजा 'सिम सिम खुल जा', असा प्रथमच किलकिला व्हायला लागेल...** कारण, त्यातूनच या रक्तपिपासू-निर्मम-शोषक भांडवली-व्यवस्थेला (Vampire-State System) प्रथमच आव्हान मिळण्याची शक्यता निर्माण झालेली असेल!

...अन्यथा, मराठी-माणसा, एक गोष्ट तुझ्या मेंदूत किंवा हवंतरं तुझ्या हृदयात, निश्चित कोरुन ठेव की... ''हे तुझं 'पातकं'च, तुला अरबी समुद्रात खोलवर बुडवणार आहे'' ...तेव्हा, ज्याची गेली चार वर्षांत एकही वीट रचली गेलेली नाही; तो **शिवछत्रपतींचा घोड्यावर स्वार झालेला भव्य पुतळा, अरबी समुद्रात नक्की उभा असेल! तो नक्की यासाठी उभा असेल; कारण, या भाजप-संघीय आणि मिंधेगटाच्या भ्रष्ट-पातकी राजकारण्यांकडून सिंधुदुर्गच्या राजकोटावर नुकताच कोसळलेला कचकड्याचा पुतळा उभारण्याचं, जे 'महापातक' घडलंय... ते तमाम मराठी-जनतेच्या पूर्ण ध्यानात आलंय; त्यामुळेच, आता ''हा अरबी समुद्रातला रेंगाळलेला पुतळा एकदाचा लवकर बांधून पूर्ण करणं'', हे भाजप-संघ आणि त्यांचे 'मांडलिक' असलेल्या एकनाथराव-अजितदादांना अगत्याचं आहे...आणि, हो मराठी-माणसा, जेव्हा तू अरबी समुद्रात बुडत असशील; तेव्हा, ''हेचि फल काय मम तपाला'' अशा हताशपणे आणि विमनस्कपणे तो शिवछत्रपतींचा पुतळा, तुझ्याकडे पहाताना म्हणेल,** ''अरे, सूरत आपल्या मुलूखाची जाळपोळ करणाऱ्या मोंगलांची, परकियांना अर्थसाह्य करत 'राष्ट्रकार्य' नष्ट करणारी... म्हणून, मी एकदा नव्हे; दोनदा लुटली आणि स्वराज्य-उभारणीच्या कार्यात भर घातली आणि तुम्ही तर 'त्यांना' अवघा महाराष्ट्र दिवसाढवळ्या लुटू दिलात''...???

*...राजन राजे*



*...दुसऱ्या बाजुला निसर्ग आणि माणसांचं अतोनात 'दोहन व शोषण' भांडवली-व्यवस्थेकडून अव्याहत होत असतंच. त्याचे पडसाद, मानवी समाजातील अशांतता-अस्वस्थता, विद्रोहजन्य परिस्थिती; तसेच, जागतिक-तापमानवाढीतून धुमाकूळ घालणारी पर्यावरणीय-महासंकटं (हवामान-बदल व जलप्रलयजन्य स्थिती, महापूर, अवर्षण, नापिकी, भूकंप, ज्वालामुखींचे उद्रेक, संसर्गजन्य रोगांच्या साथी इ.) याद्वारे उमटत रहातात. भारतीय-अध्यात्मातील शंकराच्या डमरू-वादनासह प्रलयंकारी तांडवनृत्याची संकल्पना, ती हीच होय! जगातील इतरही धर्मशास्त्रांतून 'जलप्रलया'च्या महासंकटाची मांडणी केलेली दिसते, ती पृथ्वीवर 'जलप्रलयजन्य' परिस्थिती निर्माण होणं किती सहजशक्य आहे, हे सूचित करते...फक्त, यावेळचा जलप्रलय, हा नैसर्गिक नव्हे, तर मानवी-उत्पातातून होऊ घातलाय!*

*...राजन राजे (भाई)*

# “लालबागचा राजा आणि अनंत अंबानींनी दान केलेला सोन्याचा मुकूट”....



**भारतातील ८० कोटीहून अधिक जनता दारिद्र्यात खितपत पडलेली असताना, जे अंबानी कुटुंबिय ८–१० हजार कोटीच्या बंगल्यात रहातात, त्या मुकेश अंबानींचा कनिष्ठ चिरंजीव व ज्याच्या लग्नात, भुकेकंगाल भारतीय जनतेच्या अश्रू सुकलेल्या शुष्क डोळ्यांदेखत त्यांच्या ‘अठराविश्वे दारिद्र्या’ला अगदी खिजवल्यासारखा, वाकुल्या दाखवल्यासारखा शेकडो कोटींचा चुराडा, अगदी हसत हसत नुकताच केला गेला (म्हणूनच, त्या लग्नसमारंभात आग्रहपूर्वक आमंत्रण असूनही ‘न’ जाणाऱ्या ‘राहुल गांधीं’ना ‘धर्मराज्य पक्षा’चा कडकडीत सलाम)...त्या अनंत अंबानींनी ‘लालबागच्या राजा’ला २० किलो वजनाचा व १५ कोटी रु. किंमतीचा सोन्याचा मुकूट अर्पण केला.... ही गोष्ट मराठी जनतेसाठी अभिमानाची की, आत्यंतिक शरमेची...मराठी–जनांना ती गुदगुल्या करणारी की, त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला नेणारी...???**

रामायणातल्या कथेतले ‘वाल्या कोळ्या’चे कुटुंबिय, जर वाल्याच्या पापात सहभागी व्हायला तयार नव्हते; तर, तुम्हीआम्ही दर्शनासाठी मोठमोठ्या रांगा लावून... ‘लालबागचा राजा’सारख्या मंडळांच्या आणि त्या मंडळांना आर्थिक–सहयोग करणाऱ्या, राजाश्रय देणाऱ्या रक्तपिपासू–शोषक ‘भांडवलदारां’च्या (Blood Billioners) व ढोंगी–लुटारु राजकारण्यांच्या पापात, सहभागी का होतो?”

**...आपण सर्वसामान्य मराठी–माणसांनी आरंभलंय तरी काय? जगतोद्धाराची तळमळ अंतरी बाळगणाऱ्या शिर्डीच्या फकीराला (साईबाबांना) पण आम्ही सोन्याचे मुकूट घालणार आणि त्या ‘लालबागच्या राजा’ला सुद्धा?... कमालच आहे बरं, हे सगळं कधि, तर साधं ‘पायताण’सुद्धा खरेदी करताना, आमची मराठी–जमात दहा वेळा किंमतीची लेबलं चाचपून पहाण्याएवढी ‘कफल्लक’ असते, तेव्हा...आणि, लक्षात घ्या, आम्ही जेवढ्या काळात झिजलेली पायताणं बदलतो...त्यापेक्षाही कमी काळात, या धनदांडग्या गुजराथी–भाषिक भांडवलदारांनी डझनावरी महागड्या–आलिशान गाड्या एकतर बदललेल्या असतात किंवा नव्याने खरेदी केलेल्या असतात!**

‘कर लो दुनिया मुठ्ठी में’वाला हा गुजराथी–भाषिक ‘भांडवलदारवर्ग’ आणि ‘भाजप–संघ’वाले...हे दोन्ही पक्ष, “अवघ्या समाजावर मुठभरांचं ‘वर्चस्व’ निर्माण करुन त्याद्वारे, दुनिया (म्हणजेच तुम्हीआम्ही, यांच्या पाशवी ‘मुठी’त आणि हे ‘हितसंबंधी’ लोकं एकमेकांच्या ‘मिठी’त) आपल्या पोलादी–पंजात, श्वास अडकेपर्यंत घट्ट आवळून धरुन नियंत्रित ठेवायची”, या एकमात्र विचारसरणीने व एकाच हितसंबंधाने बांधलेले किंवा प्रेरित झालेले!



..पृष्ठ क्र. ४ वर

...पृष्ठ क्र. ३ वरुन

### रिलायन्स आणि पर्यावरण....

'जागतिक-तापमानवाढी'ला कारणीभूत असणाऱ्या 'कार्बन-ऊत्सर्जना'चा भारतातील सर्वात मोठा स्त्रोत असणाऱ्या रिलायन्सचं, जर पर्यावरणीय-लेखापरीक्षण (Enviro-Audit) केलं गेलं; तर,

रिलायन्स किती भयंकर तोट्यात आहे, हे दिसून येईल...पण, आपण लेखापरीक्षण करतो फक्त, कंपनीच्या अर्थव्यवहारांचंच! पाताळगंगेसारख्या नद्या व नाले प्रदूषित करणारे व करत रहाणारे रिलायन्सवाले...'जग्गी वासुदेव' किंवा तत्सम आधुनिक ढोंगी संतांना (ज्यात, श्री श्री रविशंकर आणि रामदेव स्वामींसारखी बाकीची बरीच तथाकथित 'संतमंडळी' आलीच) करोडोंच्या देणग्या देणार आणि जग्गी वासुदेव, नद्यांच्या शुद्धीकरणाची भारतभर मोहिम राबवत शाबासकीसोबत प्रचंड निधी मिळवणार...अरे व्वा रे व्वा!

### रिलायन्स आणि नीतिमत्ता....

भारतीय नीतिमत्तेची व पर्यायाने भारतीय-अध्यात्माची जेवढी हानी रिलायन्स-समूहाने आजवर केली असेल... तेवढी, कदाचित कुठल्याच उद्योग-समूहाने केली नसेल. कॉर्पोरेटीय हिणकस डावपेच आखण्यात, युनियन्स नेस्तनाबूत करुन वा विकत घेऊन 'कंपनी-दहशतवाद' निर्माण करण्यात; तसेच, सार्वजनिक-प्रशासकीय सेवेतील भ्रष्टतेला बेछूट उत्तेजन देत आपला कॉर्पोरेटीय-कार्यभाग साधून घेण्यात...'गौतम अदानी'चा अपवाद वगळता, रिलायन्सचा हात कुणीच कधि धरु शकलेला नाही, धरणारही नाही!

### रिलायन्स आणि त्यांची उद्योगनीति....

राजकारण्यांशी व बड्या सरकारी अधिकारीवर्गाशी लागेबांधे निर्माण करत, कायदे वाकवून किंवा हवेतसे बदलून स्पर्धकांवर 'येनकेन प्रकारेण' मात करणे, स्पर्धकांना कोंडीत पकडून वा खिंडीत गाठून बाजारपेठेतली स्पर्धाच संपवणे, स्वतःची निरंकुश 'मक्तेदारी' निर्माण करणे...यात तर, रिलायन्सचा हातखंडाच!

# माझा आणि माझ्या कामगार-चळवळीचा 'लालबागच्या राजा'चा जळजळीत अनुभव....

**...वीस-पंचवीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रात 'कंत्राटी-कामगार पद्धती'च्या 'गुलामगिरी व नवअस्पृश्यते'ला औद्योगिक व सेवा क्षेत्रात ऊत येऊ लागल्यावर... एकदा नव्हे, लागोपाठ तीन वर्षे 'लालबागच्या राजा'च्या चरणी नतमस्तक होऊन, आमच्या कामगारांच्या खास आग्रहास्तव, मी कामगारांच्या वतीने स्वतः नाक घासून गाऱ्हाणं घातलं, नवस बोललो की... ''देवा, आमची ताकद कमी पडतेय रे; तेव्हा, हे लालबागच्या राजा, महाराष्ट्रातल्या मराठी-माणसाला बरबाद करणारी ही 'कंत्राटी-कामगार पद्धती'ची अवदसा एकदाची नाहीशी कर, मग मी तुझ्या मंडपाच्या प्रवेशद्वारापासून तुझ्या चरणापर्यंत माझ्या कामगारांसह जमिनीवर लोळण घेत येऊन तुझं दर्शन घेईन'' ...परिणाम काय झाला? तर, या अंबानीसारख्या बड्या उद्योगपतींच्या 'लॉबी'ने सरसकट सगळ्याच प्रस्थापित राजकारणीवर्गाला आणि कामगार-मंत्रालय व कामगार-खात्यातल्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना हाताशी धरुन महाराष्ट्रासह संपूर्ण भारतभर ती 'अवदसा' बेलगाम पसरवली आणि आता कहर म्हणजे, अनंत अंबानी 'लालबागच्या राजा मंडळा'चे प्रमुख कार्यकारी सल्लागारही बनलेत!**

...किती तरुण मराठी मुलामुलींनी ''आम्हाला चांगल्या पगाराची 'कायम' नोकरी मिळू दे'' म्हणून, या लालबागच्या राजाला वर्षानुवर्षं तास न् तास आणि ताटकळत उभं राहून 'साकडं' घातलं असेल...नोकरीसाठी 'नवस' बोलणाऱ्या अशा लाखो मराठी युवक-युवतींपैकी किती तरुण-तरुणींना अशा नोकऱ्या मिळाल्या? कोणी लावायचे हे 'नवसाला देव पावण्या'चे हिशोब?? मग जेव्हा, माझ्या महाराष्ट्रातला जवळपास सगळाच मराठी कामगार-कर्मचारीवर्ग, या भांडवलदारवर्गाचा आज पूर्ण 'गुलाम' झालाय; तेव्हा या, (तथाकथित) नवसाला पावणाऱ्या देवाचं, करायचं तरी काय, ते ठरवाच...!!!

**खरंतर, अगदी व्यक्तिगत किडूकमिडूक 'नवस' (म्हणजे, खरंतर स्वार्थच), हा 'लालबागचा राजा' काय किंवा कुठलंही तथाकथित 'जागृत दैवत किंवा देवस्थान' काय...कधिच पूर्ण करत नसतं. या सगळ्या आपल्या कमकुवत मनाच्या अंधश्रद्धा असतात....फारतर, कधिकाळी ''कावळा बसायला आणि फांदी तुटायला'', असा एखादा योगायोग घडतो, इतकंच. पण, ज्यांच्या बाबतीत असा दुर्मिळ योगायोग कधिच घडत नाही;** म्हणजेच, देव ज्यांच्या 'नवसा'ला पावत नाही, अशांची संख्या...ज्यांच्या बाबतीत हा योगायोग घडतो (म्हणूनच, ते अंधश्रद्धेला सहजी बळी पडून त्या दैवताला 'नवसाला पावणारा' म्हणून बेफाम प्रचार करत सुटतात किंवा जाणिवपूर्वक आर्थिक-लाभासाठी तशा आख्यायिका पसरविण्याचं व्यवस्थित 'मार्केटिंग', संबंधित मंडळांकडून केलं जातं) त्यांच्यापेक्षा, शेकडो नव्हे; तर सहस्रपटीने मोठी असते; पण, ते बिचारे 'मुके' रहात असल्याने, त्या अंधश्रद्धेतला फोलपणा किंवा त्यातली खरी गोम कुणाच्या लक्षातच येत नाही. ***...राजन राजे***

भांडवलशाहीत, ज्यांच्या हातात उत्पादनाची संसाधनं असतात, ते शोषक बनतात आणि ज्यांच्या हातातून परंपरागत असलेली उत्पादनाची साधने 'भांडवली-व्यवस्था' हिरावून घेते, ते शोषित-उपेक्षित म्हणून जगत रहातात. बाकी समाजातील राज्ययंत्रणा, कायदेकानून-व्यवस्था, संस्कृति-धार्मिक व्यवहार, कलाक्रिडा, शिक्षणसंशोधन, मूल्यपद्धती...या साऱ्या बाबी, हे वरवर दिसणारं हिमनगाचं टोक असतं, ज्याचा विस्तृत असा नऊदशांश पाया, हा शेतकरी व कामगारवर्गाच्या अविश्रांत श्रमावर आधारलेला असतो. वरवर दिसणार्या या समाजातील बांडगुळी-संरचनेला, कार्ल मार्क्स 'सुपर-स्ट्रक्चर'; तर, खालच्या पायाला 'सब-स्ट्रक्चर' म्हणतो! ज्याप्रमाणे, बीजातून वृक्ष संभवतो...त्याप्रमाणे, पायाभूत घटकातून (Sub-Structure), बाकी डोलारा (Super-Structure) उभा रहातो!

---

तळागाळातील श्रमिकांच्या श्रमातील 'वरकड-मूल्य' शोषणाद्वारे काढून घेण्याकामी, भांडवली-व्यवस्थेला राज्यव्यवस्था व धर्मव्यवस्था चांगलीच सहाय्यभूत होत असते...तरीही, जोरदार वादळवार्यांनी उन्मळून पडणाऱ्या वृक्षराजीसारखी, आर्थिक-महासंकटांच्या आवर्तनांनी किंवा समाजवादी-साम्यवादी वैचारिक वादळाने कोसळून पडण्याची अंगभूत शक्यता, ती शाश्वत स्वरुपात बाळगून असते! पण, मार्क्सकालीन परिस्थितीत, उत्पादनांच्या संसाधनांची मालकी हिसकावून घेण्याला हिंसक क्रांतीखेरीज कदाचित दुसरा कुठला पर्याय नसेलही; पण, आधुनिक लोकशाहीप्रधान राज्यव्यवस्थेत हिंसाचाराला थारा असूच शकत नाही, जोवर लोकशोही-पद्धतीत निवडणुका, या अत्यंत पारदर्शक व सुयोग्य पद्धतीने घेतल्या जाऊन 'लोकेच्छे'चं सरळसोट प्रतिबिंब राज्यव्यवस्थेत दिसून येत असतं.



*(सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्या. धनंजय चंद्रचूड यांच्या घरच्या गणपती-दर्शनासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आले होते...त्याचे फोटो मिडीयातून झळकले आणि देशाच्या सदसद्विवेक बुद्धीला एकच धक्का बसला...'सौरभ दास' यांनी ट्विटरवर ही अखिल 'भारतीय-वेदना' प्रस्फुटित करताना, जे प्रभावी व प्रासंगिक भाष्य केलंय...त्या त्यांच्या 'द' वरील संदेशाचा ओघवता मराठी-अनुवाद...वाचकांच्या सोयीसाठी आम्ही खालीलप्रमाणे सादर करीत आहोत...तत्पूर्वी, संपूर्ण वेगळ्या धाटणीची 'धर्मराज्य-प्रतिक्रिया' खालीलनुसार देतो आहोत...)*

**प्रति,**
**मा. सरन्यायाधीश,**
**भारताचं सर्वोच्च न्यायालय, दिल्ली**
**महोदय,**

**आपल्या घरच्या गणपतीच्या आरती व पूजनाला, देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजी आले होते...त्याचे फोटो मिडीयातून झळकले आणि समस्त भारतीय जनतेच्या मनाला प्रचंड धक्का बसला...सर्वांनाच निरतिशय क्लेश झाले! न्यायालयातील न्यायाधीश आणि सरकार...यामध्ये, शक्यतोवर ''जसं आपण 'करोना'काळात सामाजिक-अंतर ठेऊन वावरत होतो; तसंच अंतर अपेक्षित असताना, ही आपल्यातली नको तेवढी जवळीक तमाम भारतीय जनतेला आपण विनासंकोच बेधडक दाखवून दिलेलीच आहे.** शिवाय, आपला देश, घटनात्मकदृष्ट्या 'निधर्मी' असतानाही, आपल्या अशा बेजबाबदार कृतितून...सगळ्या देशालाच, आपण एक चुकीचा 'संदेश' दिलेला आहे...आपल्याकडे व देशाच्या पंतप्रधानांकडे, या अशा सगळ्या धार्मिक बाबींसाठी भरपूर वेळ आहे, असं सरळ सरळ दिसतंय (आम्ही उगाचच, आपण खूप व्यस्त वगैरे असता, अशी आमची गैरसमजूत करुन घेत असतो)... तेव्हा, तुम्ही केवळ एका विशिष्ट धर्माचरणाला अनुसरुन केलेल्या कृतिबद्दल...भारतीय-अध्यात्मानुसार 'पापक्षालनार्थ', पंतप्रधानांना सोबत घेऊन कुठल्यातरी मशिदीत, चर्चमध्ये, गुरुद्वारामध्ये आणि बुद्धविहारामध्ये एकापाठोपाठ एक जाऊन प्रार्थना कराच. अन्यथा, या भारतीय जनतेचा तुमच्यावर विश्वास बसणं फार कठीण आहे...तो विश्वास, जो याअगोदरच क्षतिग्रस्त झालाय, त्याला आता तर, तुमच्या कृतिनेच फार मोठा धक्का पोहोचलेला आहे!

**...हो, तुम्ही दोघांनी एकत्र येऊन जोडीने 'राज्यघटनेचे शिल्पकार' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पराभव घडवून आणलाय आणि देशाची पायाभरणी करणाऱ्या त्या ३८९ सदस्यीय संविधान-सभेतल्या प्रत्येक सदस्याचा**



**तुम्ही सपशेल पराभव केलेला आहे, तुमच्याच कृतिने!** तांत्रिकदृष्ट्या कदाचित तुम्हालाच काय, अन्य कुणालाही त्यात फार काही त्रुटी किंवा दोष आढळणार नाहीत; कारण, तुम्ही म्हणाल, ''बाबासाहेबांनी कुठे लिहून ठेवलंय की, पंतप्रधानाला आपल्या घरी गणेश-पूजनासाठी सरन्यायाधीशांना बोलवता येत नाही म्हणून''...

...तेव्हा, शब्दांचा कीस पाडत शाब्दिक खेळांचे पतंग उडवणाऱ्यांनो, ध्यानात ठेवा, 'भारतीय-अध्यात्म', हा एक असा अलौकिक ठेवा आहे की, तुम्ही तुमच्या नकली 'हिंदुत्वा'चे बाहू पसरुन...जसे महाभारत युद्ध संपल्यानंतर, भीमाला मिठीत करकचून आवळून यमसदनी पाठवण्यासाठी, धृतराष्ट्राने आपले बाहू पसरले होते...तसे तुम्ही दोघांनी, 'भारतीय-अध्यात्मा'ला मिठीत करकचून आवळू पाहिलंत; तरी, ते तुम्हाला शक्य होणार नाही. 'हिंदुत्व', ही कुणाची जहागिरदारी नाही, मनसबदारी नाही किंवा न्यायालयात प्रविष्ट (Sub-Judice) बाब नव्हे...आणि, 'जाज्वल्य हिंदुत्व' कशाशी खातात, हे ना भाजपाई-संघीय लोकांना कळलंय, ना ते त्यांना जाणून घ्यायचंय!

...त्यांना आणि त्यांच्या शिंदेगट-अजित पवारगट यासारख्या मांडलिकांना फक्त आणि फक्त, 'हिंदुत्वा'चा अनैतिक आधार घेऊन राजकारण नावाचा 'धंदा' जोरात चालवायचाय, बस्स!

**जाज्वल्य हिंदुत्वात 'विद्वेषा'ला बिलकूल थारा नाही (**Malice and Hatred towards None**)...तिथे फक्त, 'प्रेम, सत्य आणि न्यायनीति'चा जागता पहारा आहे! असं हिंदुत्व, प्रासंगिक शत्रुत्वाचा, अन्याय, अत्याचाराचा 'प्रतिकार' कठोरपणे जरुर करतं...तसा तो केला गेलाच पाहिजे; पण, उगाचच कुठल्या समस्त जातजमातीचा 'तिरस्कार' कधिच करत नाही!**

...ज्यांना 'गणपती किंवा गणेश' हे दैवत, पार्वतीमातेच्या अंगावरच्या मळापासून बनलंय, असं वाटतं...त्यांच्या बुद्धिची कीव, ती किती करावी?

'हत्तीचं शिर व मनुष्य देह' अशा, या महान दैवताचा मतितार्थ, भारतीय-अध्यात्माला काय व कसा अभिप्रेत आहे, याचं या बनावट हिंदुत्ववाद्यांपैकी कोणाला विश्लेषण-संश्लेषण कधि करता येईल?

...तर ते विश्लेषण सत्यार्थाने आहे, 'मनुष्ययोनी आणि प्राणीयोनि'तलं महान 'अद्वैत''!

ज्या भारतीय-अध्यात्मात (अर्थातच, जाज्वल्य हिंदुत्वात...भाजपा-संघीय ढोंगी-बनावट हिंदुत्वात नव्हे) 'मनुष्य आणि प्राणिजात' यातसुद्धा तन्मयता-समरसता मानली जाते, जोपासली जाते...तिथे, भारतीय-अध्यात्माचं एक मोठं व महत्त्वाचं अंग असलेल्या जाज्वल्य हिंदुत्वात, मनुष्यजातीच्या आपापसातील 'विद्वेषा'ला कधि थारा मिळू शकेल?

...तेव्हा, आजपर्यंतच्या अनेक घटनाक्रमांकडे पहाता... "Yes, both of you are 'guilty'!"

...पण, आज फक्त, ताज्या घटनेवरच लक्ष केंद्रित करत, पुन्हा एकवार आपणास नम्रपणे सुचवतो की, केल्या अपराधातून 'मुक्ति' मिळवण्यासाठी (जाज्वल्य हिंदुत्वात, मोकळ्या मनाने शरणागत झालेल्या अपराध्याला 'क्षमा' करण्याची तरतूद आहेच) मशिदीत, चर्चमध्ये, गुरुद्वारामध्ये आणि बुद्धविहारामध्ये जाऊन जोडीने प्रार्थना करा आणि पुनश्च भारतीय न्याय-व्यवस्थेवरचा विश्वास कायम राखण्याला मदत करा... धन्यवाद!

***...राजन राजे***

## *माय बाप...*

*आई म्हणाली बाळा,*
*तुझ्या बापाचे श्राध्द घालायचे आहे!*
*घरावरच्या गच्चीवर जेवणाचे ताट*
*तुला ठेवायचे आहे!*
*कावळ्याच्या रुपाने तुझा बाप येणार*
*आणि आज जेवणार आहे!*
*मनाला माझ्या मोठा आनंद झाला.*
*कारण बाप माझा भेटणार आहे!*
*मी ठेवलेले जेवण जेवणार आहे!*
*आनंदाने ताट लागताच गच्चीवर*
*पटापटा कावळे लागले जमायला*
*आता मात्र प्रश्न पडला मनाला,*
*बाप समजू कोणाला?*

*तेवढयात एक कावळा पुढे आला*
*ठेवलेल्या ताटाला शिवला.*
*एकामागून एक एक कावळा येऊ*
*लागला.*
*ठेवलेल्या ताटाला शिवू लागला.*

*शिवला तर शिवला भरकन उडूनही*
*गेला!*
*गेला तर गेला शेजारच्या घरावरही*
*गेला!*

*तिथल्याही ताटाला जावून शिवला!*
*हे सारं पाहून डोकं गेलं संतापून*
*घरात येऊन प्रश्न विचारला आईला,*
*सांग बाप कुणाचा शेजारच्याचा की*
*माझा?*
*त्या अनेक कावळ्यांमधील*
*नेमका माझा बाप कोण?*
*आणि माझ्या बापाची घरे*
*आहेत तरी किती?*
*(मन की बात)*



# मूळ इंग्रजीमधील ‘सौरभ दास’ यांचा ‘द’ वरील लेख खालीलप्रमाणे उद्धृत करीत आहोत...धन्यवाद!

Saurav Das on X:

**आजच्या रात्री सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांच्या घरात चित्रित झालेली अस्वस्थ करणारी दृश्ये देश पहातोय. न्यायालयीन–व्यवस्थेचं पावित्र्य आपल्या आपल्या हृदयात जपून ठेवणाऱ्यांसाठी, हे एक फार मोठं अभद्रसूचक दुश्चिन्हच होय...ते न्यायालयं आणि सरकार, यामधील अत्यावश्यक असणारं अंतर धोकादायकरित्या पुसून टाकणारं आहे...दोन्हींमधील ‘रेषा’ जाहिरपणे अंधुक–अस्पष्ट झाल्याचं दाखवून देणारं आहे.**

केवळ, भविष्यातील देशाच्या सरन्यायाधीशांनाच नव्हे; तर, देशभरातल्या सर्वच जिल्हा न्यायालये, उच्च न्यायालये, सर्वोच्च न्यायालयाधील प्रत्येक न्यायाधीशासाठी...जो यातून अगदी धोकादायक संकेत जातोय, तो फारच काळजी करायला लावणारा आहे. या एका साध्या गोष्टीतून सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी आपल्या वारशापेक्षाही कितीतरी अधिक महत्त्वाचं असं काही धोक्यात टाकलंय. तत्त्वतः त्यांनी अवघ्या संस्थेच्या विश्वासार्हतेशीच तडजोड केलेली आहे. लोकांना न्यायव्यवस्था स्वतंत्र असल्याचं वाटावं म्हणून न्यायसंस्थेचा प्रमुख या नात्याने तिचं स्वातंत्र्य त्यांनी अबाधित राखणं अपेक्षित होतं. पण, हे दृष्य एकदम विरुध्द टोकाच्या ध्रुवावरचं चित्र रंगवतंय.

सध्याचं सरकार, हे न्यायालयांपुढचं सर्वात मोठा दावेदार पक्ष आहे. दोन्ही पक्षांमधील वाढती मित्रता, ही लोकशाहीसाठी काळरात्र ठरेल! परिणामांच्या लाटा न्यायालयीन कचेऱ्यांच्या बऱ्याच पलिकडे जाऊन पोहोचतील. पुढल्या दाव्यांसाठी, याचा काय अर्थ लावायचा?

**न्यायपीठाला आव्हान देणं, प्रश्न विचारणं आणि उत्तरदायी बनवणं...ही ज्यांची जबाबदारी आहे, अशी**



**वकीलांची असोसिएशन, कुठल्याही विचारधारेचा असलेला वकीलवर्ग...या घटनेनंतर सरळ सरळ गायब आहे. सर्वोच्च न्यायालयाची बार असोसिएशन कुठे आहे आज? ज्या संस्थेमार्फत ते सेवा देतात, ती संस्थाच तडजोडीचा बट्टा लावून बसलेली असेल...तर, पुढे काय होणार? कारण, नजरेसमोर सरन्यायाधीशांच्या घरातलं जे दृश्य उलगडतंय, तो फक्त काही एक देखावा नाहीय, बरोबर? न्यायालयीन स्वातंत्र्याच्या संकल्पनेच्या अस्तित्वाशी हे सर्वकाही निगडीत आहे.**

निवृत्तीपश्चात ‘‘बिनकामाचा मोठा मोबदला’’ मिळवण्यासाठी, आपल्या मुलांना आरामदायी मोठ्या पगाराची नोकरी मिळण्यासाठी, स्वतःच्या पदोन्नतीसाठी... कुठल्या स्तरापर्यंत झुकतात याबाबत, उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची चाललेली कूजबूज वाढत चाललीय. हे सडणं–कुजणं जर अनियंत्रित झालं तर, ते खोलवर झिरपेल. ज्या संस्थेविषयी आपल्याला एवढं ममत्व असल्याचं, सरन्यायाधीश दावा करत असतात; त्या संस्थेला आपण किती हानी पोहोचवलीय, याचा ते थोडातरी विचार करतायत?

**काही मोजके सन्माननीय अपवाद वगळता, आपल्या संसद–सदस्यांनीही याची फारशी दखल घेतलेली नाही.**

**विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, यांनी देशाच्या ‘सदसद्विवेकबुद्धीचे रक्षक’ म्हणून एखादं वक्तव्य नको होतं करायला?**

इतर संसद–सदस्यांनी याचा निषेध करुन न्यायालयीन–स्वातंत्र्याचं एकासुरात महत्त्वं नको का अधोरेखित करायला? जेव्हा सैन्यदलाच्या प्रमुखांनी राजकीय–विधाने केली होती, तेव्हा त्यांनी पूर्वी तसं केलं होतंच. मग, इथे त्यांना कोणी थाबवलंय? ट्विटर वरील केवळ एखादी प्रतिक्रिया, या लोकशाहीच्या तिसऱ्या स्तंभासाठी काही कामाची नाही. आपल्या लोकसभा–सदस्यांनी यावर आवाज उठवला पाहिजे. मोदी–सरकारच्या इतर कुठल्याही कृतिला ‘घटनाविरोधी’ असल्याचा दोषारोप करण्याएवढीच ही कृतिदेखील ‘घटना–विध्वंसक’ आहे.

---

**Saurav Das on X:**

Tonight, the nation watches, as disturbing visuals come from the residence of the Chief Justice of India. For those who hold the sanctity of the judiciary close to their hearts, this sends an ominous signal—a dangerous erosion of the distance that must exist between the Judiciary and the Executive. A public display of blurring of lines.

More worrisome is the absolutely dangerous signal it sends to not just future Chief Justices of India, but to every Judge in the Supreme Court, High Courts and the district courts across the nation. Chief Justice Chandrachud has, with this single act, put at risk something far more important than his own legacy. He has potentially compromised the integrity of the entire institution. As head of the judiciary, he was to safeguard its independence so people perceive the judiciary to be independent. But this visual paints a polar opposite picture.

The government of the day is the biggest litigant before the courts. Such increased bon-homie between the two spells doom for democracy. The consequences ripple far beyond the courtrooms. What does this mean for the cases that lie ahead? What is astonishing is that the Bar, the very lawyers, from whichever ideology, whose duty it is to challenge, question, and hold the Bench accountable are conspicuously missing! Where is the Supreme Court Bar Association? If the institution that they practice in is perceived compromised, what happens then? Because the visual unfolding at the Chief Justice's residence is not just about optics right? It's about the survival of the very idea of judicial independence! Whispers of Judges in the High Courts, Supreme Court kowtowing for post-retirement sinecures, for cushy appointments for their children, for their own elevations are growing louder. This rot, if left unchecked, will seep deeper. Was the Chief Justice of India at all thinking about the harm this has caused for the institution he so dearly claims to love?

Except for a few honourable exceptions, our Members of Parliament too have not taken cognisance of this. Should not the Leader of the Opposition, @RahulGandhi, as conscience keeper issue a statement? Shouldn't other Parliamentarians condemn this and unequivocally reaffirm the importance of the Judiciary's independence? They did this in the past when Army Chief was issuing political statements. What stops them here? A mere comment on Twitter does no good for the third pillar. Our Parliamentarians need to step up. This is as destructive to the Samvidhaan as any other action they accuse the Modi government of.

# अमराठी दुकानदारांबद्दल काही गुपित/वास्तव कळेल का?

## मराठी उद्योजकांचे डोळे, खाडकन उघडणारी माहिती

धंद्यामधे सिंडीकेटस असतात, रॅकेट्स असतात तसेच जातीय ग्रुप्ससुद्धा असतात फक्त त्याला 'चेंबर ऑफ कॉमर्स' असे नाव नसते. ते पृष्ठभागावरदेखील नसते. ही सिस्टीम इतकी स्मूथ बसली आहे की, आपल्याला रोज पाहूनसुद्धा त्यातला जातीय कोन लक्षात येत नाही. ते वाईटच आहे, असे म्हणता येईल का? याबद्दल वेगवेगळी मतं येतील.

असा व्यवसाय केला जातो, हे कोणताही अभ्यासक्रमात किंवा कार्यक्रमात शिकवले जात नाही. हे कुठे पुस्तकातही वाचायला मिळणार नाही .

### यांचे काम कसे चालते? ते त्यांच्याकडूनच शिका.

माझे अनेक पटेल मित्र आहेत. गुजरातेत तर त्यांचे वर्चस्व आहेच. मी काही दिवस 'इन्श्युरन्स एजंट' म्हणून काम केलं. इन्शुरन्स एजंटला अनेक गोष्टी माहीत होतात. मी फर्ग्युसन रस्त्यावरच्या एका पटेलाकडून नियमित स्टेशनरी विकत घ्यायचो. माझ्या व्यवसायासाठी लागणारी काही रजिस्टर्स मी डिझाईन केली होती. ती हा बनवून द्यायचा. पुण्यात सर्वात पहिल्यांदा त्याच्याकडे जंबो कलर झेरॉक्स मशीन आले होते. छोट्या जागेतून त्याने व्यवसाय वाढवला. त्या कष्टाचे कौतुक आणि अभिमान दोन्ही आहेच. माझ्या ब्रँचचा धंदासुद्धा त्याला दिल्याने मला तो चांगला मानायचा. या विश्वासावर त्याला माझ्याकडून पॉलिसी घेण्याबद्दल विचारले. ही पॉलिसी घेतली; तर, भांडवलवृद्धी होणार होती आणि ती हिट जाणार याबद्दल तज्ञांना विश्वास होता. एलआयसीच्या निवडक चांगल्या पॉलिसीमधली एक होती ती. त्यालाही ते मान्य होते. मैत्रीसुद्धा मान्य होती. पण त्याने जे सांगितले ते चक्रावून टाकणारे होते.

**या पटेलांचे एक मासिक (काय म्हणायचं त्याला?) निघते. त्या मासिकात कुठला पटेल काय धंदा करतो याची माहिती, फोन नंबर वगैरे तपशील दिलेला असतो. एक पटेल औरंगाबादला आहे. त्याच्याकडे कसल्या तरी स्टील प्लेट्स बनतात. तर मग ठाण्यातल्या पटेलाला त्या प्लेट्स त्याच्याकडून घ्याव्या लागतात. मुंबईतल्या पटेलाकडे जर त्या प्लेट्स मिळत असतील, तर मग तो घेऊ शकतो. पण पटेलाव्यतिरिक्त दुसऱ्याकडून चुकूनही घ्यायचे नाही, असा दंडक आहे.**

**इन्श्युरन्ससाठी राजस्थानातून तीन पटेल पुण्यात येतात. पॉलिसी त्यांच्याकडून काढून घ्यायची, हा नियम आहे. शेजारी इन्श्युरन्स एजंट राहत असेल आणि तो पटेल नसेल, तर त्याच्याकडून पॉलिसी घेता येत नाही. मुंबईतसुद्धा बरेच पटेल इन्श्युरन्स एजंट्स आहेत. त्यांचे ग्राहक ठरले आहेत. थोडक्यात पटेल व्यावसायिकांनी आपसातच स्पर्धा करायची. एकाचा ग्राहक दुसऱ्याने पळवायचा नाही. जर तो ग्राहक स्वत:हून वळाला तरच.**

हे अलिखित नियम जर तोडले गेले तर, समुदायाकडून त्या पटेलाला अगदी छोटासा दंड लावला जातो. **त्या काळी २१ रू होता. आताचे माहीत नाही. पण, अमक्या तमक्या पटेलाने २१ रू. दंडापोटी भरले हे त्यांच्या त्या पुस्तिकेत प्रकाशित झाले रे झाले की, तो पटेल आयुष्यातून उठतो. त्याच्याशी सर्व प्रकारचा धंदा समुदायाकडून बंद केला जातो. त्याला समाजाच्या बँकादेखील कर्ज देत नाहीत. भिशीतून त्याला बाहेर काढले जाते.**

### दुसरे उदाहरण सोमवंशीय क्षत्रिय समाजाचं, अनेकदा लिहीले आहे त्याबद्दल.

पूर्वी या समाजाचं ऑफीस स्वारगेटला होतं. आता नारायण पेठेत आहे. कानात बाळी घालणारे मिठाईची, हार्डवेअरची, सायकलसची, मेडीकलची, गिफ्ट आर्टिकलची दुकाने चालवणारे अस्वच्छ राजस्थानी लोक ही त्यांची ओळख आहे. पुण्यात, मुंबईत सर्वत्रच यांची दुकाने लक्षणीय आहेत. गुजराथी समाज पूर्वी जो किरकोळीचा व्यवसाय करायचा तो आता यांच्याकडे आहे. गुजराथी समाज होलसेलमधे गेला आहे.

**राजस्थानी दुकानदार गावाकडून एक मुलगा आणतो. त्याला राबवून घेतो. त्याचा पगार समाजाच्या ऑफीसकडे जमा करतो. मुलगा मोठा झाल्यावर जेवढे पैसे पगाराचे जमा झाले असतील तेवढेच दुकानदार भर घालून देतो. या मुलाला मग, समाज दोन लाख रूपये उचल देतो (आकडे जुने आहेत). त्यातून त्याचा मालक त्याने हेरून ठेवलेले दुकान भाड्याने मिळवून देतो. दोन लाखात पागडी आणि दोन वर्षाचे भाडे असते. पगार जमा झालेला असतो. त्यातून तो वस्तू आणतो. कमी पडलेले पैसे समाजाकडून कर्ज म्हणून मिळतात. मग त्याचं दुकान चालू लागते. (दुकान चालेल का हा प्रश्नच नसतो). मग तो गावाकडून एक मुलगा आणतो. पुढे ही सायकल रिपीट होते. अशा पद्धतीने एकाची दोन, दोनाची तीन दुकाने होत जातात. हळूहळू सगळीकडे राजस्थानीच दिसू लागले आहेत. आता या दुकानांना लागणारा मालसुद्धा राजस्थानीच पुरवणार. यांचेही विमे त्यांचा समाजातला प्रतिनिधीच उतरवणार.**

आजपर्यंत समाजाकडून मिळालेल्या उचल आणि कर्जाला कुणी बुडवलेले नाही. धंदा चालला नाही असे झालेले नाही. यांना बँकेची आवश्यकता नाही. कायदेशीर बाबींसाठी एखादे अकाउंट असते फक्त. यांच्यातही दंड लागतो.

### तिसरे उदाहरण अग्रवाल समाजाचे.

हा वेगळा समाज आहे. यांचे जैन, शहांशी सख्य असते. यांची किराणा मालाची दुकाने असतात. मार्केट यार्डातल्या अग्रवालाकडे ते माल भरतात. अग्रवाल नसेल तर, मग शहा, जैन. साधारण २०, २१ तारखेला हे महिन्याचा माल भरायला येतात. त्या वेळी त्यांना पैसे द्यायचे नसतात. पैसे कधी हे शेठ विचारत नाहीत. हेच सांगतात ३ तारखेला हिसाब चुकता करेंगे. बाजूचा मराठी दुकानदारही त्याच शेठकडे माल भरायला आलेला असतो. पण त्याच्या आणि अग्रवालच्या दुकानात हटकून पाच पैशाचा फरक असतो. कारण हे शेठकडे रडतात. बाजूमे पाटील का दुकान है. साब मराठी माणूस उधरच जायेंगे. मग तो याला वेगळा दर लावतो. शिवाय खरेदी रोख नाही.

याच्याकडे एखाद रूपयाचा फरक असला की, सगळी गर्दी त्याच्याकडे लोटते. एक तारखेला जास्तीत जास्त जोर असतो. जवळपास सगळा माल संपलेला असतो. दोन तारखेला माणूस पाठवला जातो. शेठचा हिशेब क्लोज.

अजून बरीच उदाहरणे आहेत. इथे फक्त तीनच नमुने दिले आहेत.

भारतातली बाजारपेठ अशीही चालते आणि खुलीही चालते. पण, ही बारीक कलाकुसर माहीत नसलेले जेव्हां वाद घालायला येतात तेव्हां त्यांच्याशी काय बोलायचे ?

### आतातरी शहाणे व्हा .

हल्ली बिल्डरांच्या पण संघटना आहेत. त्यांच्यातही सिंडीकेट्स निर्माण झालेत. जातीच्याच बिल्डराला जमिनी द्यायचे करार होताहेत. कुठल्याही रिअल इस्टेट एजंटला नवे ट्रेन्ड्स विचारा.

खाण्यापिण्याच्या बाबतीत आजही अंधश्रद्धा, रुढी आहेत. त्या नाहीतच असे म्हणणाऱ्यांना कोपरापासून नमस्कार. असे महानुभाव मला देवासमान आहेत. त्यामुळे त्यांचेच मत प्रमाण.

### मग आपण कुठे आहोत?

मराठी भाषिक समाज कधी असा विचार करणार.

व्यवसायात एकमेकांना मदत कधी करणार.

आता तरी आपल्यासारख्या सुशिक्षित तरुणांनी यावर विचार मंथन करावे.

Business Help Group करून तालुकावर मदत केंद्रे स्थापन करावीत.

आपला समाज मागास राहिला याला दुसरे कोणीही जबाबदार नाही तर, आपणच जबाबदार आहोत.

समाजाला मदत होईल असे उपक्रम न राबविता आपण फक्त राजकारण करीत राहिलो.

राजकारण कराच; पण, राजकारणाचा फायदा समाजाला होईल असे उपक्रम सर्वांनी सुरु करावेत.

**धन्यवाद,**

**जय महाराष्ट्र, जय शिवराय**

*(समाजमाध्यमातून साभार...)*

# पंडित नेहरूंबाबत काही महत्त्वाच्या गोष्टी -



१) नेहरुंकडे बॅरिस्टरी आणि इतर शिक्षणाच्या खऱ्या पदव्या होत्या. त्यांच्या वर्गातले असंख्य वर्गमित्र जगाला माहीत आहेत.

२) नेहरूंना इंग्रजी अस्खलित यायची. ते Mrs. ला येम आर येस असे वाचत नसत.

३) नेहरूंनी कधीही Teleprompter वापरून भाषणे दिली नाहीत.

४) आईनस्टाईन, चार्ली चॅप्लिनसारखे लोक नेहरूंचे मित्र होते. त्यामुळे ते कधीही कुणाच्या गळ्यात पडत नसत.

५) नेहरूंनी कधीही भिक मागून खाल्ले नाही.

६) नेहरूंची बहुतांश खानदानी संपत्ती (घर, गाड्या वगैरे) त्यांनी राष्ट्राला दान केली. त्यांनी कधीही लोकांच्या पैशाने स्वतःला विमाने, गाड्या, महागडे गॉगल किंवा डिझायनर कपडे खरेदी करत ऐश केली नाही.

७) नेहरूंचे त्यांच्या पत्नीवर अपार प्रेम होते आणि त्यांनी कधी पत्नीला सोडले नाही किंवा लपवून ठेवले नाही. नेहरूंच्या पत्नीनेसुद्धा नेहरूंना स्वातंत्र्यलढ्यात तितकीच तोलामोलाची साथ केली.

८) नेहरूंनी कधी कुठल्या पोरींचे फोन टॅप केले नाहीत किंवा कुणामागे सरकारी जासुस लावले नाहीत.

९) नेहरू प्रेस कॉन्फरन्स घ्यायला घाबरत नसत. उलट जगभरातील मिडीयासोबत कुठलेही प्रश्न आधीच लिहून न देता थेट चर्चा करत असत.

१०) नेहरूंनी भाभा, साराभाई अशा विद्वान लोकांना हाताशी ठेवून विज्ञान आणि व्यवस्थापन संस्था उभ्या केल्या. त्यांनी कधीही कुठल्या भोंदू महाराजांच्या दरबारात डोके टेकवले नाही.

११) नेहरूंनी त्यांच्यावर टीका करणाऱ्या कुठल्याही पत्रकाराला खोट्या केसेस लावून जेलमध्ये टाकले नाही.

१२) नेहरू देशासाठी जवळपास १० वर्षे जेलमध्ये राहिले होते. जेलमध्ये असतानाही ते विविध विषयांचा अभ्यास करत होते आणि उत्तमोत्तम साहित्यनिर्मिती करत होते. मी देशासाठी घर, परिवार सोडला; १० वर्षे जेलमध्ये राहिलो वगैरे रडगाणे मात्र, त्यांनी कधीही गायले नाही.

१३) नेहरूंना जगभरातील मीडिया स्टेट्समन म्हणत असे. त्यांना कुणीही थापाड्या किंवा गळेपडू वगैरे म्हणत नसे.

१४) नेहरू कधीही उद्योगपती, सेलिब्रिटी लोकांच्या मागे धावत नसत. उलट तेच लोक नेहरूंनी आपल्याला २-४ मिनिटे द्यावी, म्हणून धडपडत असत.

१५) नेहरू कधीही कुठल्या स्त्रियांचा अमक्या पक्षाची विधवा सूर्पणखेसारखे हास्य, तितक्या करोडची गर्लफ्रेंड म्हणून अनादर करत नसत.

खोटा इतिहास पसरवून नेहरूंना कितीही बदनाम केले आणि जाहिरातीमधून हटवले, तरी नेहरू बदनाम होत नाहीत आणि इतिहासातून जात नाहीत.

नेहरू हिमालय आहे... दलींदर उंदरांचा उभा जन्म आणि त्यांच्या हजार पिढ्या गेल्या; तरी, तो पोखरून पाडता येणार नाही.

**लव्ह यू चाचा नेहरू**

*(समाजमाध्यमातून साभार...)*

सिंधुदुर्गातील राजकोट किल्ल्यावर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अनावरण झालेला, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा, अवघ्या आठ महिन्यांतच कोसळला. या पुतळ्याच्या बांधकामात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार आणि बेपर्वाई झाल्यामुळेच, ही दुर्दैवी घटना घडलेली असून, या घटनेला सर्वस्वी महाराष्ट्राचे महायुती सरकार जबाबदार आहे... याच पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र विकास आघाडीच्या वतीने आणि शिवसेना पक्षप्रमुख मा. श्री. उद्धवजी ठाकरे यांच्या नेतृत्त्वाखाली, ''हुतात्मा चौक ते गेट वे ऑफ इंडिया'' असे रविवार, दि. १ सप्टेंबर-२०२४ रोजी, ''जोडे मारो आंदोलन'' करण्यात आले. यावेळी 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांचीदेखील उपस्थिती होती. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, कोल्हापूरचे खासदार छत्रपती शाहू महाराज, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष श्री. नाना पटोले, शिवसेना नेते श्री. विनायक राऊत, श्री. विनोद घोसाळकर, विभाग प्रमुख श्री. अजय चौधरी, नवी मुंबई जिल्हाप्रमुख श्री. विठ्ठल मोरे, बँकिंग तज्ज्ञ श्री. विश्वास उटगी, 'धर्मराज्य पक्षा'चे समीर चव्हाण, सिद्धेश सावंत आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) व काँग्रेस पक्षाचे हजारो कार्यकर्ते-पदाधिकारी उपस्थित होते.



# ‘बदला पुरा’, अशा देवाभाऊच्या यूपी–स्टाईल बॅनरबाजीचा ‘हिसाब पुरा’....

- ज्या सरकारने बदलापूर लैंगिक–शोषण प्रकरणातील आरोपीचा ‘एन्काऊंटर’ करवला...त्या सरकारला, ज्या ‘काळी टोपी’धारी कट्टर संघीय राज्यपालाने सत्तेवर बसण्यासाठी आशिर्वाद दिला; त्या राज्यपालांचा तो निर्णय, **सर्वोच्च न्यायालयीन निर्णयानुसार घटनाविरोधी...म्हणजेच, गेली अडीच वर्षे सत्तेवर जबरदस्तीने बसवलं गेलेलं एकनाथ–देवेंद्र (अजित पवार, हा इंजिन म्हणून जोडला गेलेला; पण, प्रत्यक्षात निव्वळ एक बघ्याची भूमिका घेणारा ‘डबा’ नंतर जोडला गेला म्हणून) जोडगोळीचं ‘महाराष्ट्र–सरकार’ सरळ सरळ बेकायदेशीर आणि घटनाविरोधी!**
- अरुण टिकू हत्याकांडातील आरोपी विजय पलांडेला पोलिसांच्या ताब्यात असताना पळून जाण्यास मदत केल्याच्या आरोपामुळे काही काळापूर्वी ‘निलंबित’ केला गेलेला पोलिस निरीक्षक ‘संजय शिंदे’, थेट डोक्यातच अचूक गोळी मारतो (माजी पोलिस अधिकारी रवींद्र आंग्रेंच्या ‘अनुभवी’ म्हणण्यानुसार एवढं मोठं पाऊल एकट्याने उचलण्याची ‘हिंमत’ या संजय शिंदेकडे नाहीच)...यात, वरुन कोणाच्या तरी आदेशावरुनच, त्याने हे पाऊल उचलल्याचा दाट संशय घ्यायला भरपूर वाव आहेच!
- ज्या ‘देवाभाऊ’चे एन्काऊंटरनंतर अभिनंदनाचे बॅनर्स भाजपच्या भक्तुल्ल्यांनी लावलेत आणि जे कोणी सत्ताधारी राजकीय–प्रवक्ते, एन्काऊंटरच्या बाजुने आपापल्या ‘राजकीय–गॉडफादर’च्या (अर्थातच, असले बहुतांश ‘गॉडफादर’, हे हॉलिवूडच्या ‘गॉडफादर’ चित्रपटातल्या ‘खलनायका’सारखेच, स्वतःच खतरनाक गुन्हेगार असतात) इशाऱ्यावरुन कुठलातरी ‘महापराक्रम’ केल्यासारखे बेंबीच्या देठापासून ‘गोदी–मिडीया’तून कोकलतायत...त्या ‘देवाभाऊ’चे बदलापूरकर पोलिस, लैंगिक–शोषणाची तक्रार येऊन देखील १२–१२ तास पीडित मुलीच्या पालकांना, ‘वरुन आलेल्या इशाऱ्या’वरुन (कारण, संबंधित शाळा–चालक भाजप–संघाचे स्थानिक कट्टर आधारस्तंभ...जसा, DRDO च्या ‘हनीट्रॅप’ प्रकरणातील ‘देशद्रोही व गद्दार’ शास्त्रज्ञ प्रदीप कुरुलकर देखील होता) पोलिस ठाण्यात निर्दयपणे व बेजबाबदारपणे बसवून ठेवतात आणि प्रचंड लोकक्षोभानंतरच गुन्हा नोंदवून घेतात; पण, अद्यापही घटनास्थळीचं CTV Footage गायब करणाऱ्या तसेच, शाळेत सरकारी–निर्देशानुसार CCTV न लावणाऱ्या ‘फरार’ संस्थाचालकांना अटक करण्यात अपयशी ठरतात...तेच देवाभाऊचे ‘अकार्यक्षम’ पोलीस, बनावट झटापटीचं खोटं निमित्त करुन झटपट ‘एन्काऊंटर’ करुन आपली बनावट ‘कार्यक्षमता’ दाखवून मोकळे होतात (ज्याबाबत, मा. मुंबई उच्च न्यायालयाने देखील सूतोवाच केलेलं आहे)... याचा काय अर्थ



लावायचा?

...या दुर्दैवी घटनाक्रमादरम्यानच अजून एक चिमुरडी बेपत्ता झाल्याचं वृत्त होतं... तिचं पुढे काय झालं?

त्या शाळेत वरपासून खालपर्यंत नेमका काय उत्पात घडत होता, जो कदाचित लपवण्यासाठीच, अटकेतल्या आरोपीला कायमचं ‘शांत’ करण्यात आलं??

**सात्विक–संतापापोटी बदलापूर–स्थानकात उत्स्फूर्त आंदोलन करणाऱ्या ‘बदलापूरकरां’वर, जी नंतर भयंकर पोलिसी–दडपशाही केली गेली व त्यांच्यावर जाणिवपूर्वक गंभीर गुन्हे नोंदविण्यात आले...त्यातून, गमावलेली बदलापूरकरांची व महाराष्ट्रातील अन्य संतप्त मतदारांची मते मिळवण्याचा, ‘एन्काऊंटर’ हा एक अश्लाघ्य प्रयत्नच होय!**

आता, येत्या विधानसभा–निवडणुकीत महाराष्ट्राची जनता (विशेषतः बदलापुरची) ‘सूज्ञ’ आहे की, ‘अज्ञ’... ते एकूणच बदलापूर–प्रकरण आणि भ्रष्टाचार–बेजबाबदारपणातून सिंधुदुर्गाचा कोसळलेला शिवछत्रपतींचा गंजका व तकलादू पुतळा उभारणाऱ्या देवाभाऊच्या ‘बुलेट’ला ‘बॅलेट’मधून एकदम खणखणीत–संतप्त उत्तर देतात किंवा नाही, यावरुन कळेलच!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

## ‘‘फडणवीसांच्या कारकीर्दीत महाराष्ट्राचा ‘उत्तर प्रदेश’ होण्याची प्रक्रिया गतिमान झालीय...फडणवीस हे महाराष्ट्राचे, कायदा धाब्यावर बसवणारे, नवे ‘योगी आदित्यनाथ’ झालेयत का?’’ ...हे ‘एन्काऊंटर’, केवळ एका आरोपीचं नसून संपूर्ण ‘न्यायालयीन–व्यवस्थे’चंदेखील आहेच, हे कसं विसरुन चालेल??

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्या. धनंजय चंद्रचूड यांच्या घरच्या गणपती–दर्शनासाठी देशाच्या पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या जाण्यातून...या देशाची न्यायव्यवस्था, भाजप–संघाची ‘बटीक’ झाल्याचा (याचा अर्थ, आताशी न्यायालयातून ‘न्याय’ कमी आणि ‘निकाल’ जास्त मिळतो), जो संदेश जनतेपर्यंत गेला... त्याचीच परिणती, आजच्या बदलापूर लैंगिक–शोषण प्रकरणातील आरोपीच्या, अशा ‘एन्काऊंटर छाप’ घटनांतून ‘न्यायालयीन–व्यवस्थेचा पूर्ण ‘अधिक्षेप’ होण्यात झालीय.

...जर, हे महायुती–सरकार, येत्या निवडणुकीत खाली खेचलं गेलं नाही; तर, यापुढे न्यायालयांनाच धाब्यावर बसवणाऱ्या...अशाप्रकारच्या अनेक घटना, क्रमाक्रमाने ‘एकनाथ–देवेंद्र–अजित’ ट्रिपल–इंजिन सरकारकडून होत जातील...देखते रहो!

- संस्थाचालक वगैरे असलेले कुणी आपटे, आठवलेबाई यांना एवढ्या दिवसात अटक करण्यास ‘असमर्थ’ ठरलेले आणि स्वतःची हत्यारे नीट सांभाळू न शकणारे ठाण्याचे नादान पोलीस आणि त्यांचा ‘बॉस’ असलेलं अवघं गृहमंत्रालय...ही सगळीच एक मोठी अकार्यक्षम व भ्रष्टाचाराने बरबटलेली यंत्रणा झालीय, देवेंद्र फडणवीसांच्या कारकीर्दीत!
- ‘‘ना रहेगा बाँस, न बजेगी बाँसुरी’’ या न्यायाने, शाळेत जाणिवपूर्वक CCTV न बसवणाऱ्या, या सगळ्या संघ–भाजपा समर्थक ‘उन्मत्त पिसाटां’ना वाचवण्यासाठीच तर हा खटाटोप नसणार ना... हा जनतेच्या मनातला रास्त संशय, कोण धसाला लावणार?
- शिवबा–संतांच्या महाराष्ट्राच्या नीतिमत्तेची साफ वासलात लावण्याचं अर्धवट राहीलेलं नरेंद्र मोदी–अमित शहा दुकलीचं नीच कर्म पूर्ण करण्याचा विडाच जणू, शिंदे–देवेंद्र यांनी उचलल्याचं, या निमित्ताने दिसतंय!
- ठाणे–शहर, हे वाहतूक–कोंडीच्या दृष्टीकोनातून ‘मृतप्राय’ शहर (Dying City) झालेलं असताना; तुलनेनं प्रवासी–वहातूक तुरळक असलेल्या ‘मुंब्रा–बायपास’वरच अगदी अचूक ‘एन्काऊंटर’ कसा होतो?
- ठाण्यात अनेक नामचीन गुंड धुमाकूळ घालत असताना... आणि, पोलिसांच्या देखतच राजकीय–कार्यकर्त्यांवर ते गुंड हल्ले करत असल्याची उदाहरणं ताजी असताना... त्यांचे कधि ‘एन्काऊंटर’ झाल्याचं ऐकिवात नाही; उलटपक्षी, कालपर्यंत नामचीन गुंड असलेले अनेकजण, अचानक ‘मुख्यमंत्र्यांचे राजकीय–कार्यकर्ते’ काय बनतात आणि त्यांच्यासोबत, ठाण्यात ‘मुख्यमंत्र्यांचे बॅनर्स’ काय चौकाचौकात झळकतात...याचा अर्थ, मतदार म्हणून, जनसामान्यांना कळत नसेल; तर, ते ‘फुकटेपणा’तून ‘जनावरांच्या योनि’त गेल्याचीच आपल्याला समजूत घालून घेण्यावाचून दुसरा पर्याय रहात नाही.
- आरोपीकडून झालेल्या (तथाकथित) गोळीबारात किरकोळ जखमी झालेल्या पोलिसांना शासकीय इस्पितळात न नेता, एका खाजगी पंचतारांकित हॉस्पिटलमध्येच कसं काय नेलं जातं, ज्यामध्ये ठाण्यातल्या ‘सत्ते–मत्ते’ने बड्या; पण, नीतिमत्तेनं अत्यंत नीच–अधम असलेल्या राजकारण्यांचे मोठे ‘हितसंबंध’ गुंतलेले आहेत आणि आजवर ज्या हॉस्पिटलसंदर्भात अनेक लुटमारीच्या ‘सुरस’ कथा ठाण्यात सर्रास प्रचलित आहेत?

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# गोरक्षकांनी आर्यन मिश्राच्या केलेल्या खुनाच्या निमित्ताने, स्वामी विवेकानंद यांची आठवण

**आर्यन मिश्रा या १९ वर्षांच्या तरुणाची काही गोगुंडांनी (तथाकथित गोरक्षकांनी) २३ ऑगस्टला फरीदाबादमध्ये गोळ्या घालून हत्या केली. यांना गोरक्षक म्हणण्याऐवजी गोगुंड म्हणणे अधिक योग्य. यापूर्वी या गोगुंडांनी अनेक मुस्लिम व्यक्तींचे खून केले आहेत. आता त्यांनी हिंदू तरुणालाच ठार मारले आहे.**

हे गोरक्षेच्या नावाखाली वावरणारे पाखंडी लोक आजच तयार झालेले नाहीत. स्वामी विवेकानंद काळातदेखील ते होते आणि अशा एका गोरक्षकाच्या स्वामी विवेकानंदांसोबत झालेल्या भेटीचा किस्सा शरदचंद्र चक्रवर्ती यांनी नोंदवून ठेवला आहे. हा किस्सा रामकृष्ण मठाने प्रकाशित केलेल्या 'स्वामी विवेकानंद ग्रंथावली'च्या तिसऱ्या खंडात आहे. ही भेट १८९७ मध्ये कलकत्त्यातील बागबाजार भागातील प्रियनाथ मुखोपाध्याय यांच्या घरात घडली.

शरदचंद्र चक्रवर्ती लिहीतात, **''मिरर पत्राचे संपादक नरेंद्रनाथ सेन निघून गेल्यावर गोरक्षण मंडळाचा एक प्रचारक स्वामीजींच्या भेटीला आला. पूर्ण जरी नसला तरी त्याचा वेष काहीसा संन्याशासारखा होता. डोक्याला भगव्या रंगाचा फेटा. चेहरा पाहताच तो उत्तर हिंदुस्थानी असल्याची खात्री पटावी. तो आल्याचे कळताच स्वामीजी समोरच्या खोलीत आले. स्वामीजी येताच त्यांना वंदन करून त्याने गाईचे एक चित्र स्वामीजींना दिले. जवळच बसलेल्या माणसाच्या हाती ते चित्र देऊन स्वामीजींनी त्याच्याशी बोलावयास सुरुवात केली.''**

**स्वामीजी: आपल्या या मंडळाचा उद्देश काय?**

**प्रचारक: आम्ही देशातील गाईंची कसायांच्या हातून सुटका करतो. जागोजाग गोशाळा बांधून तेथे रोगी, दुबळ्या आणि कसायांच्या हातून सोडविलेल्या गाईंचे पालनपोषण करतो.**

**स्वामीजी:** फार चांगले काम आहे आपले हे. हा खर्च चालवायला पैशाची काय व्यवस्था करता तुम्ही?

**प्रचारक:** आपल्यासारखे उदार लोक दयाबुद्धीने जे काही देतात, त्यातूनच हा खर्च आम्ही चालवितो.

**स्वामीजी:** आजपावेतो आपल्यापाशी किती पैसा जमला आहे?

**प्रचारक:** मारवाडी-व्यापारी या कामात सढळ हाताने पैसा ओततात. त्यांनी या कामासाठी बराच पैसा दिलेला आहे.

**स्वामीजी:** मध्यभारतात भयंकर दुष्काळ पडला आहे. खुद्द सरकारने नऊ लाख लोकं 'अन्न-अन्न' करीत मेल्याचे आपल्या अहवालात जाहीर केले आहे. आपल्या मंडळाने या भूकेलेल्यांना मदत करण्यासाठी काही करण्याचे ठरविले आहे काय?

**प्रचारक:** असल्या दुष्काळ-बिष्काळाच्या कामात आम्ही भाग घेत नाही. गोमातेचे रक्षण करण्याच्या हेतूनेच आमचे हे मंडळ स्थापन झाले आहे.

**स्वामीजी:** लाखोंच्या संख्येने 'अन्न-अन्न' करून आपल्यासारखीच माणसे दुष्काळात मरत असताना, शक्य असूनही त्यांना पोटाला अन्न देऊन मदत करणे, तुम्हाला योग्य वाटत नाही काय?

**प्रचारक:** नाही. हा दुष्काळ म्हणजे त्यांच्या कर्माचे, पापाचेच फळ होय. जसे करावे तसे भरावे. जसे कर्म तसे फळ.

प्रचारकाचे हे उत्तर ऐकून स्वामीजींचे मुखमंडळ अगदी लाल झाले आणि त्यांच्या त्या विशाल डोळ्यातून जणू आग बाहेर पडू लागली. पण, संतापाची ती ऊर्मी आतल्याआत दाबून ते म्हणाले, ''ज्या सभा, जी मंडळे माणसासारख्या माणसाकडे सहानुभूतीच्या दृष्टीने पाहत नाहीत, आपलेच बंधुबांधव उपासमारीने तडफडत मरत असल्याचे पाहूनही त्यांचे प्राण वाचविण्यासाठी एक मूठ धान्य न देता, पशुपक्ष्यादिकांचे प्राण वाचविण्यासाठी धान्याचे ढीगचे ढीग वाटण्याकरता जे पुढे सरसावतात, त्यांच्याबद्दल मला काडीचीही सहानुभूती वाटत नाही. अशांच्याकडून समाजाचा काही विशेष फायदा होणे सर्वथा अशक्य होय, असे माझे मत आहे. माणूस आपल्या कर्माने मरतो, असे म्हणून कानावर जर हात ठेवले तर, जगात प्रयत्नाला काही अर्थच रहाणार नाही. आणि मग गाईंना वाचविण्याच्या तुमच्या या धडपडीला तरी काय अर्थ? आपल्या कर्मानीच गाई कसाया हाती पडतात आणि मरतात. आम्ही त्यांच्यासाठी अंगमोडून काम करण्यालाही अर्थच नाही.''

प्रचारक तर हे ऐकून किंचित हादरलाच. पण स्वतःला सावरून तो म्हणाला, ''आपण म्हणता ते खरेच. पण शास्त्रात सांगितले आहे की गाय आपली आई आहे.''

यावर किंचित हसून स्वामीजी म्हणाले, ''हो, गाय आपली आई आहे, हे तर उघडच दिसते आहे. एरवी असली अलौकिक प्रजा आणखी कुणापोटी निपजणार?''

**स्वामीजींनी मारलेला हा टोमणा त्या प्रचारकाच्या लक्षातच आला नसावा असे दिसले. अधिक चर्चा न करता, स्वामीजींनी या कार्याला काही मदत करावी, अशी त्याने विनंती केली.**

**स्वामीजी: हे बघा, मी तर हा असा संन्यासी, फकीर. तुम्हाला द्यावयाला माझ्यापाशी कुठून बरे पैसा येणार? आणि यदाकदाचित माझ्या हाती पैसा आलाच तर तो मी आधी माणसांच्या सेवेसाठी खर्च करीन. प्रथम वाचवावयास हवा माणूस- आधी त्याला द्यावयाला हवे अन्नदान, विद्यादान, धर्मदान. हे सारे करून जर माझ्या हाती काही शिल्लक राहीले तर मी तुमच्या संस्थेला काही देऊ शकेन.**

स्वामीजींचे बोलणे ऐकून त्यांना नमस्कार करून तो प्रचारक निघून गेला. तो गेल्यावर स्वामीजी पुढे म्हणाले, ''काय पण बोलला! म्हणे की माणूस मरतो आपल्या कर्मानी, त्याला दया दाखवून काय होणार? देशाचा अधःपात झाल्याचे ह्याच्याइतके दुसरे स्पष्ट प्रमाण नाही. हिंदुधर्मातील तुमचा कर्मवाद कोणत्या अधोगतीला जाऊन पोहोचला आहे, हे पाहीले? माणसासारखा माणूस असून माणसासाठी ज्याचे हृदय द्रवत नाही, त्याला काय माणूस म्हणायचे?'' हे बोलत असताना स्वामीजींचे सारे अंग क्षोभ आणि दुःख यांनी थरारून गेले.

करुणामय स्वामीजी आज हयात असते; तर, आजच्या क्रूर खूनी गोगुंडांबाबत काय म्हणाले असते? याची कल्पना करणे कठीण नाही. ते जे म्हणाले असते, ते आज आपण सर्वांनी म्हणण्याची गरज आहे! *(समाजमाध्यमातून साभार...)*

# ''विचारस्वातंत्र्य विरुद्ध धर्मांधता: विवेकाच्या कवाडांची लढाई''

शहाणा माणूस न पटणाऱ्या विचारांवर टीका करतांना त्या विषयाच्या पुस्तकात संदर्भ शोधायला लागेल, न की विद्वानांच्या अकलेची दिवाळखोरी काढून उध्दटपणा दाखवेल. म्हणूनच विचारवंत सुधारक authentic संदर्भ तपासून पाहील्याशिवाय त्यांचे विचार मांडायला ते धर्माधांसारखे उथळ नक्कीच नसतात.

दुसरे असे की, धर्ममार्तंडाच्या लेखी विचारवंतांचे सगळेच संदर्भ चुकीचे असतील; तर, ते कशाच्या आधारे पुर्वजांचे गोडवे गातात? की त्यांचे संदर्भ तेवढेच खरे आणि विचारवंतांचे खोटे?

एखादा संदर्भ आपण जेव्हा देतो तेव्हा तो हवेतला असू नये, एवढी खबरदारी शहाणा माणूस घेतो. मी जेव्हा संदर्भ देतो, तेव्हा ती पुस्तके माझ्याकडे उपलब्ध असतात. कारण मला हवेत बोलायची सवय नाही. आणि पुर्वजांचा वृथा अभिमानही नाही.

आपल्या मेंदूची कवाडे सुधारक नेहमी उघडी ठेवतात, आपले विचारच फक्त खरे आहेत आणि तेच स्विकारायाला हवेत अशी विचारांची सक्तीही ते करत नाहीत. तरीही धर्मांधळे सुधारकांना शिव्या घालतात, तुच्छ लेखतात, आमचाच धर्म तुम्हाला दिसतो का, आमच्या भावना दुखावल्या म्हणत त्यांचा दाभोळकर करण्याचा धाक घालतात. किती दांभिक आहोत आपण!

थोरामोठ्यांचे विचार मांडणे हे समाजाला दिशा देण्याचे काम करते. पण वाचणारे आपल्या कुवतीच्या नजरेतून वाचतात. त्यातून ते आपल्या सोईचे तत्वज्ञान तयार करतात. कारण तेच त्यांना सुखावह वाटते. पण त्यामुळे होते काय की, अशी माणसे आपल्या मनाची कवाडे बंद करून आपल्यातच मशगुल रहाण्यात आनंद मानायला लागतात. आज समाजात अशाच आत्मकेंद्री माणसांची वाढ झाल्यामुळे एकूण परिस्थिती हाताबाहेर जात चालली आहे. म्हणून माणसाचे वागणे मूल्यरहीत आणि मूल्यविवेक नष्ट करणारे होत आहे. अशी माणसे आपल्याला पटते तेच खरे असा अट्टाहास धरतात. त्यामुळे त्यांच्या लेखी समाजधुरीणांनी नविन विचारांचे केलेले मंथनही कुचकामीच ठरते. कावीळ झालेल्यांना सगळं जगच जसं पिवळं दिसतं, त्याचप्रमाणे इतर धर्मांचा तिरस्कार करणाऱ्यांना कुणी चांगले सांगितले तरी, ते द्वेषाचेच फुत्कार टाकतात. पण द्वेषाने हिंसेला खतपाणी मिळते. म्हणून सूज्ञ जगाला प्रेम अर्पावे, हे लक्षात घेऊन सुज्ञ माणूस वाईटातूनही चांगले शोधायचा प्रयत्न करतो.

*(समाजमाध्यमातून साभार...)*

# हरियाणानंतरची बनवेगिरी आणि भाजपाचे ‘विकृत’ राजकारण!!!

**सन २०१९मध्ये सी.एस.डी.एस. (सेन्टर फॉर द स्टडीज ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज) लोकनीति या संस्थेने ‘‘पंतप्रधान म्हणून तुमची निवड काय? नरेंद्र मोदी की राहूल गांधी?’’ असा हरियाणामध्ये सर्वे केला होता. ही संस्था सरकार व जनतेच्या आर्थिक सहाय्यावर चालत असली, तरी ती आजही आपले काम प्रामाणिकपणे व कर्तव्य निष्ठेने करत आहे. २०२४ मध्ये भाजपा-मोदी यांच्या प्रतिकूल स्थिती निर्माण झाल्याचा पहिला रिपोर्ट याच संस्थेने दिला होता. २०१९ला हरियाणातील जनतेने मोदी यांना ५७ टक्के, तर राहूल यांना १५ टक्के मते दिली होती. याच संस्थेने २०२४ला पुन्हा याच प्रश्नांवर सर्व्हे केला, तेंव्हा राहूल गांधी यांना ३० टक्के, तर मोदी यांना ३२ टक्के हरियाणा जनतेने पसंती दिली. राहूल तेंव्हा मोदी यांच्या बरोबरीला आले, म्हणजे एकाअर्थी ते मोदींच्या पुढेच गेले.**

याचाच परिणाम २०२४च्या मतदानात आपल्यासमोर आला. हरियाणात जो जाट समुदाय आहे, त्याची ३३ टक्के मते काँग्रेसला २०१९ला मिळाली होती आणि २०२४ ती ६४ टक्क्यांवर पोहोचली. दलित समुदाय २०१९ ला काँग्रेसला २८ टक्के मते देतो आणि २०२४ ला ६८ टक्के! भाजपाला दलितांची अनुक्रमे २०१९ ला ५८ टक्के तर २०२४ ला अवघे २४ टक्के मते मिळतात! ओबीसीची २०१९ ला काँग्रेसला मते मिळतात २२ टक्के आणि २०२४ ला मिळतात ५१ टक्के! आणि, याच समुदायाची भाजपाला २०१९मध्ये ७३ टक्के आणि २०२४ ला ती येतात ४४ टक्क्यांवर! भाजपाच्या अप्पर कास्ट मतांचीही हीच अवस्था आहे! म्हणजे एकट्या राहूल गांधी यांच्या निवडणूक प्रचारातील बेख्वाब सहभागाने २०२४ ला भाजपाची ही अशी दूरवस्था केली होती .

**२०२४मध्ये राहूल गांधी जे मुद्दे उठवत होते व त्यामागील त्यांचा प्रामाणिकपणा त्यांच्या दोन यात्रा व त्यानंतरही त्यांचा सामान्य जनतेशी होणारा संपर्क व संवाद यामुळे मतदानात इतके मोठे परिवर्तन घडले होते. याचा भाजपाच्या धुरिणांनी व स्वतः मोदी यांनी जो धडा घ्यायचा तो घेतला! तो धडा म्हणजे राहूल मैदानात आले तर मोदी तात्काळ ‘‘पानीकम’’ होणार! म्हणून राहूल आपल्या ‘‘संविधान, जातीगत जनगणना, आरक्षण तेही जातीच्या संख्येनुसार व तशीच त्यांची हिस्सेदारी, सामाजिक न्याय’’ या त्यांच्या मुद्यांसह निवडणूक प्रचारात येऊच नये, अशी भाजपाची तीव्र आणि रणनीतिक इच्छा आहे. म्हणूनच राहूल गांधी यांना चहू बाजूंनी घेरण्याची ही रणनीतिक कवायत सुरू आहे आणि राहूल गांधी आलेच, तर त्यांना त्यांच्या मुद्यांवर प्रचारच करता येऊ नये व आजच्या त्यांच्यावरील विविध आरोपांचे खंडण करण्यातच ते अडकले जावेत, अशीही व्युहरचना आहे.** राहूल गांधी यांच्या अमेरिका भेटीतील भाषणांचा भाजपाच्या दोन डझन नेते व मंत्री आणि थेट देशाचे उपराष्ट्रपती धनकड हे जाहिरपणे विपर्यस्त प्रचार करत आहेत व त्याचाच राहूल गांधी यांनी खुलासा करत रहावे व पुन्हा त्या खुलाशाचेही आपल्याला ‘‘सोयीनुसार भांडवल’’ करता यावे असे वातावरण आज एखाद्या षडयंत्रासारखे भाजपाने कार्यवाहीत आणले आहे! आज भाजपा नेते-पुढारी जाहीरपणे राहूल गांधी यांना ‘‘टार्गेट’’ करत आहेत, या देशाच्या एका विरोधी पक्षनेत्यावरची लायकी नसलेल्या चिल्लर नेत्यांकडून अत्यंत हिंसक-खतरनाक पध्दतीने हे हल्ले राजरोसपणे होत आहेत आणि त्यात भाजपा अध्यक्षही सामिल होत आहेत, हे दृष्य समग्रतेने पहा!

जनता बाकी सर्व त्यांच्या जिव्हाळ्याचे, निकडीचे प्रश्न सोडून देऊन याच चर्चेत ही निवडणूक पार पडावी हीच या ‘‘हल्लाबोल’’ मागची स्ट्रॅटेजी आहे. भाजपाचे कार्यकर्ते - RSS स्वयंसेवक जनतेत आपली ओळख न दाखवता ‘पब्लिक’ म्हणून हेच षडयंत्र साळसूदपणे मोठे - व्यापक करत आहे आणि हे सर्व अशासाठी की, २०२४ च्या



निवडणुकांमध्ये राहूल गांधी जसे आपल्या मुद्यांनिशी उतरले व भाजपाला त्यांनी गारद केले, तसेच आत्ताही होऊ नये. ही धोक्याची घंटी भाजपाला आज उठता-बसता, दिवस-रात्र ऐकू येत आहे. कमालीची बेचैन करत आहे आणि रचनेवर रचना करत ते आपला विखारी राजकारणाचा तंबू शाबूत ठेवू पहात आहेत.

२०२४ च्या निवडणुकांमध्ये राहूल गांधी मोदींच्या तथाकथित व अब्जो रुपये खर्चून तयार केलेल्या ‘करिश्म्या’लाही भारी पडतात हे भाजपा-RSSने २०२४ला अनुभवले आहे आणि म्हणूनच आज ही राहूल गांधी यांना इलेक्शनपासून दूर ठेवण्याची जोरदार अशी सामूहिक कसरत चालू आहे आणि तिकडे अमेरिकेत RSS-हिंदू महासभा, गुजराती व्यापारी-उद्योग संघटना ‘‘पैसा खोल के’’ मोदींचे स्वागत करत असली, तरी ‘अमेरिकन जनता’ तसेच काही राजकीय नेते मोदींचा कडवा विरोध करत आहेत, असे व्हिडीओज, बातम्या जगभर व्हायरल होत आहेत. दाखवत नाही, व्हायरल होत नाहीत, ते आपला ‘राष्ट्रीय मिडीया’ वर! मात्र, हाच मिडिया मोदी यांच्या स्वागताची भले ती मोदी समर्थक संस्था-संघटनांची नियोजनपूर्वक असो ती ‘अमेरिकाची’ म्हणून आवर्जून दाखवत आहेत .

**भाजपाची दुसरी कसरत थेट हरियाणा राज्यातच चालू आहे. भूपेंद्र सिंग हुड्डाविरूध्द शैलजा कुमारी असे एक पर्सेप्शन मिडीयामार्फत झोकून देण्यात आले आहे! जाटविरूध्द दलित असा त्याला रंग देण्यात आला आहे. हरियाणाचे मुख्यमंत्री सैनी आज कुमारी शैलजा यांचा मोठा कड घेऊन पत्रकारांशी बोलत आहेत. हुड्डा व शैलजा हे दोघेही आहेत काँग्रेसचे! हुड्डा जाट तर शैलजा दलित! आणि त्यांच्यातील काही मतभेदांना ‘‘मोडठं’’ करून त्याला काँग्रेसमधील एखाद्या मोठया संघर्षाचे रूप देण्यात येत आहे. ‘‘हरियाणाची काँग्रेस ना ‘राहूल गांधी’ची आहे ना काँग्रेस पक्षाची! तर ती आहे भूपेंद्र सिंग व त्यांचे चिरंजीव दिपेंदर सिंग हुड्डा या परिवाराची’’ असा अगदी जोरदार प्रचार सध्या भाजपाकडून चालू आहे! या आधी अख्ख्या काँग्रेसला ‘‘गांधी परिवाराची’’ म्हणून बदनाम करण्याचा भाजपाने प्रयत्न केला. आजही करत आहे.** पण इथे मात्र हुड्डा परिवार! आजची अख्खी ठडड काही मोजक्या परिवारातूनच पिढ्यानपिढ्या चालत आली आहे, यांची वाच्यता मात्र कधी करत नाही. याच परिवारातून आलेले भाजपा नेते आपला मुलगा, नातू, चुलत्याचे पोर, मेव्हण्याचे पोर यांना उमेदवारी देऊन नेते बनवतात, याचा ‘बभ्रा’ मात्र होऊ दिला जात नाही. आज RSS मध्ये बहूजनांची जी पोरं (नकळत) दाखल झाली आहेत, ती भाजपाच्या तथाकथित **‘‘सोशल इंजिनिअरिंग’’च्या चक्रव्यूहातून! येतात राजकीय महत्वाकांक्षेने भाजपामध्ये! आणि त्यांना नियोजनपूर्वक RSS चे ‘स्वयंसेवक’ केले जाते! आणि आम्ही चर्चा करतो ‘‘साला हे तरूण या संघात कसे?’’** असो.

तर भाजपा आज पुन्हा जाती केंद्रस्थानी ठेवून हरियाणातील निवडणूका लढवू पहात आहे. काँग्रेसची लोकसभेची मते कमी होतील अशी पृष्ठभूमी आणि निवडणूक वातावरण आज भाजपा हरियाणात तयार करत आहे. ...पृष्ठ क्र. १२ वर

# ''अदानींच्या हितासाठी बेघर करणाऱ्या शिंदे-फडणवीस सरकारचा तुघलकी निर्णय!''

**या महाभ्रष्ट सरकारचा आणखी एक कारनामा... अदानींच्या स्वार्थासाठी शासकीय कर्मचाऱ्यांना बेघर करण्याचा काढला तुघलकी फर्मान!**

- पंतप्रधान मोदीं यांचे परममित्र अदानींचे 'महल' बांधण्यासाठी कोणत्याही थराला जायला शिंदे-फडणवीस सरकार तयार आहे. मग त्यासाठी कितीही लोकांना बेघर करावं लागलं तरी चालेल.
- ऐन गणपती उत्सवाच्या काळात कुर्ला येथील मदर डेअरीच्या कर्मचारी वसाहतीत राहणाऱ्या कुटुंबांना १५ दिवसांत घरे खाली करण्याचा क्रूर आणि तुघलकी फर्मान यांनी काढला आहे.
- ही कुटुंबं वर्षानुवर्षे या जागेत वास्तव्यास असून, केवळ अदानींच्या स्वार्थासाठी या लोकांना विस्थापित केले जात आहे. अजूनतरी या कुटुंबांना कुठेही राहण्याची पर्यायी व्यवस्था दिलेली नसून, त्यापूर्वीच त्यांना घरं खाली करण्याचे आदेश देणे, ही सरकारची अतिशय किळसवाणी चाल आहे. हे सरकार आपल्या लाडक्या उद्योगपतीसाठी निर्लज्जपणे लोकांना बेघर करत आहे. हे या सरकारचं जरा अतिचं होतंय..!
- या जागेवर केवळ सार्वजनिक उद्यान उभारले जावे, यासाठी कुर्ल्यातील नागरिकांनी मोठी जनचळवळ उभारलेली आहे. तरीदेखील मित्रासाठी काहीही आणि कसंही करायला तत्पर असलेले हे सरकार लोकांच्या आंदोलनाकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करत आहे. शिवाय जनतेचा आवाज दाबण्यासाठी आणि त्यांना वाकवण्यासाठी दडपशाही मार्ग अवलंबत आहेत. त्यावर मुख्यमंत्री शिंदे यांचे स्थानिक आमदार मंगेश कुडाळकर हे मदर डेअरीच्या जमीन हस्तांतरणाच्या आदेशाला मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिल्याचा खोटा दावा वारंवार करत आहेत.
- पण खरे सत्य हे आहे की, धारावी पुनर्वसनाच्या आडून संपूर्ण मुंबई काबीज करणे हाच या मोदानी सरकारचा खरा हेतू आहे.

आम्ही मुंबईकर लुटारू सरकारचे घातकी मनसुबे कधीही यशस्वी होऊ देणार नाहीत. आम्ही या महाभ्रष्टाचाराच्या विरोधात लढत राहू.

https://x.com/VarshaEGaikwad/status/1833154259874877447?t=J76mo7-6yLASf5ibiRrbBw&s=19
https://www.facebook.com/share/r/ZEchVxhQLjy84KV3/?mibextid=qi2Omg
https://www.instagram.com/reel/C_s0lgfI-qW/?igsh=amwwbDI3aGV6b285




## हरियाणानंतर छाती बनवेगिरी करण्यासाठी तेथे भाजपाचे 'विकृत' राजकारण चालू आहे! ...पृष्ठ क्र. ११ वरुन

अमेरिकेत राहूल गांधी काय बोलले व त्यांचे स्पष्टीकरण प्रचार सभांमध्ये मागावे, त्यांनी ते द्यावे हे खरं तर कोणत्याही राज्याच्या निवडणूकांमध्ये असू शकत नाही. राज्यांचे प्रश्न-समस्या, आर्थिक-सामाजिक स्थिती यावर या निवडणुका होत आल्या आहेत. **राहूल गांधीची वक्तव्ये ही फार तर एका पत्रकार परिषदेचा विषय होऊ शकतो. पण भाजपाने तो ''जणू देशावर आभाळ कोसळले'' अशा थाटात सादर केला आहे. कारण आज हरियाणा जनतेच्या गळ्यातला ताईत झालेल्या राहूल गांधी यांना या ''खुलाशा''च्या चक्रव्यूहात अडकवून, ते ही निवडणूक जिंकू पहात आहेत.**

२०२४चीच राहूल गांधी यांनी निर्माण केलेली स्थिती याही विधानसभा निवडणुकीत राहिली, तर काय होईल? तर २०२४ चे मतदानाचे आकडे वर दिलेच आहेत. राहूल गांधीचा प्रचार तसाच बेबाक-बेख्वाप आणि केवळ मुद्यांचाच राहिला म्हणजे महिला, शेतकरी, गरीब शेतमजूर, बेरोजगार तरूण, दलित, ओबीसी यांचाच राहिला, तर काँग्रेसच्या ७० ते ८० जागा प्रचारातच फिक्स होतील आणि निवडणूक आयोगाला हा-ताशी धरून लोकसभेसारखी उद्या भाजपा जिंकली, तर त्यावर कोणीही विश्वास ठेवणार नाही. म्हणून, १०० टक्के जिंकणारी काँग्रेस या प्रचारकी गदारोळात हारू शकते, असेच फक्त भाजपाला वातावरण तयार करायचे आहे. बाकी तयारी तर झालीच असणार! कारण, चार राज्यांतील या निवडणूका आहेत. याचा उर्वरित राज्यांवर परिणाम होणारच आहे. भाजपा इथे जिंकतेच आहे, असे वातावरण निर्माण झाले; तर, २०२४ चा राहूल गांधी यांनी सेट केलेल्या तो सामाजिक न्यायाचा ट्रेण्ड आम्ही उध्वस्त केला, अशी भाजपाची छाती बनवेगिरी सुरू होईल.

धन्यवाद मित्रांनो !

***...विजय घोरपडे.*** (समाजमाध्यमातून साभार...)

# माझे गुरूदेव!

**(२८ सप्टेंबर, माझ्या गुरुदेवांची जन्मतिथी. त्या निमित्ताने हा २०१३ च्या मार्चमध्ये गुरुदेवांच्या पुण्यतिथीनिमित्त लिहीलेला लेख पुन्हा शेअर करत आहे.)**

भारतीय परंपरेमध्ये गुरूस्मरणाला खूप महत्त्व आहे. इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे २३ मार्च हा माझ्या गुरूदेवांचा महानिर्वाणाचा दिवस. त्यांनी या दिवशी हसत मुखाने इहलोकीचा त्याग केला. भारतीय परंपरेत गुरूंच्या स्मरणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. का करायचे गुरूंचे स्मरण? ते प्रसन्न होऊन मनोकामना पूर्ण करतील म्हणून करायचे का? कृतज्ञतेने त्यांचे उपकार मानायचे म्हणून करायचे का? की त्यांच्या आत्म्याला शांती लाभो यासाठी त्यांचे श्राद्ध म्हणून करायचे? गुरूंचे स्मरण यापेक्षा खूप वेगळ्या कारणासाठी करायचे असते. गुरूंनी आपल्याला जीवनाकडे बघायची वेगळी दृष्टी दिलेली असते. त्यांनी स्वतःच्या जीवनात या जीवनदृष्टीचा उपयोग करून मार्गक्रमण केलेले असते. त्यांचे स्मरण करून आपल्या मनात ही जीवनदृष्टी दृढ करायची असते. गुरूंनी त्यांच्या जीवनात कशी साधना केली, हे आठवून त्यांचे अनुकरण करायचे असते.

**जीवनामध्ये गुरूंच्याकडून अनुग्रह घेतला, साधना सुरू केली आणि आपण सहज जीवनमुक्त झालो, असे होत नाही. जीवनात अनेक प्रलोभने असतात, ध्येयच्युत करणारे मोह असतात, अडचणी असतात, विवंचना असतात. साधनेच्या मार्गावरील या अडचणी मनाला चंचल बनवतात. या चंचल मनाला पुन्हा पुन्हा मार्गावर आणण्यासाठी आदर्शांचे स्मरण करणे गरजेचे असते. मनाकडून अभ्यास करवून घ्यावा लागतो. अध्यात्मिक वाटचालीत शॉर्टकट नसतो. तिथे नवसाची लालूच उपयोगी पडत नाही. तिथे फेवरेटीज्म नसतो.**

मी अध्यात्मिक वाटचाल असा शब्द वापरलाय खरा, पण अनेकजण त्याचा गूढवादी अर्थ, जादूई अर्थ गृहीत धरतात. पण मला अपेक्षित असलेला अर्थ वेगळा आहे. मला जी काही अध्यात्माची व्याख्या माझ्या अध्यात्मिक गुरूंकडून समजली, त्यानुसार सर्वव्यापित्वाची जाणीव म्हणजे जीवनमुक्ती. आणि ती साध्य करण्याची वाटचाल म्हणजे आध्यात्मिक साधना!

गुरू तुम्हाला शोधावा लागत नाही, योग्य वेळी तो तुम्हाला स्वतःहून येऊन भेटतो. पण ती योग्य वेळ म्हणजे काही ठराविक मुहूर्त किंवा जादूई घटना असे मानण्याचे कारण नाही. उलट तुमचा मानसिक विकास होत असताना आतापर्यंत तुमच्या अवतीभवती असलेलाच गुरू तुम्हाला अनुग्रह देतो.

माझ्या गुरूदेवांना मी लहानपणापासून ओळखत होतो. त्यांच्याविषयी मी वाचलेदेखील होते. पण त्यांचा अनुग्रह मात्र मला वयाच्या अठ्ठावीसाव्या वर्षी झाला. आणि तोदेखील ग्रंथ साक्षात्काराच्या रूपाने! या साक्षात्कारानंतर मी हादरून गेलो, अस्वस्थ झालो. माझ्या सर्व पूर्वकल्पनांना, गृहितकांना, विचारांना माझ्या गुरूदेवांनी मुळापासून हादरविले.

त्यांनी मला 'सोहं'चीच दीक्षा दिली, पण त्यांनी सांगितलेला 'सः'चा अर्थ मात्र मला ठाऊक असलेल्या अर्थाच्या विरूद्ध होता. ते 'सः'ला 'चिन्मय' न मानता 'जड' मानत होते. हेच माझ्या तोपर्यंतच्या विचारांना छेद देणारे होते.

**परंतु हे शिकवणाऱ्या माझ्या गुरूंची अवस्था मात्र 'स्थितप्रज्ञ' होती. भगवद्गीतेतील दुसऱ्या अध्यायात जी**



**स्थितप्रज्ञाची लक्षणे वर्णन केली आहेत,**

**नसे दुःखात उद्वेग सुखाची लालसा नसे।**
**नसे तृष्णा भय क्रोध तो स्थितप्रज्ञ संयमी।।**

त्याप्रमाणे होती.

माझ्या गुरूदेवांचे त्यांच्या तेविसाव्या वर्षीच महानिर्वाण झाले. त्यांचा मृत्यू त्यांना कित्येक दिवस आधी ठाऊक झाला होता. पण त्यांच्या मनाची स्थिती 'निर्वाती ठेविला दीप तेवतो एकसारखा' अशी होती. मृत्यू समोर दिसत असताना अजिबात विचलित न होता ते आपल्या सहकाऱ्यांना मार्गदर्शन करत होते.

त्यांना त्यांचा मृत्यू चुकवता आला असता, परंतु त्यांनी तो चुकवला नाही. त्यांचा कोवळ्या वयातील मृत्यू टळावा म्हणून त्यांचे वडील याचना करू लागले तर त्यांनी ते स्पष्टपणे नाकारले.

**मृत्यूच्या दिवशी तर, ते शांतपणे वाचन करत होते. ते दृश्य म्हणजे श्रीकृष्णाने गीतेत म्हटल्याप्रमाणे पुढील श्लोकाची मूर्त प्रचिती होती,**

**'करावे मिळवावेसे नसे काही जरी मज।**
**तिन्ही लोकी तरी पार्था कर्मी मी वागतो चि की।।**

**माझे गुरूदेव तरूण होते. जेमतेम तेवीस वर्षांचे आयुष्य जगले, पण ते जन्मतःच जीवनमुक्त होते असे मात्र मी म्हणणार नाही. त्यांचा जन्म समृद्ध कुटूंबात झाला. त्याग, बलिदानाची परंपरा असलेले त्यांचे कुटूंब होते. असे सांगतात की त्यांचा जन्म झाला तेव्हा त्याकाळच्या राजवटीने त्यांच्या काकांना व वडिलांना तुरुंगात डांबले होते. कशासाठी? तर त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला होता म्हणून.**

माझ्या गुरूदेवांना मनोनिग्रह करण्यासाठी वेगळे प्रयत्न करावे लागले नसल्याचे दिसते. समृद्ध घर, रूबाबदार व्यक्तिमत्त्व लाभलेल्या आणि ऐन यौवनात असलेल्या वयात प्रेयसी, पैसाअडका, धंदा-व्यवसाय यांची स्वप्ने त्यांनी पाहीलीच नाहीत. उलट ध्येयप्राप्तीसाठी त्यांनी घरदार सोडले, आणि तेदेखील अगदी सहज. घर सोडल्यानंतर सोन्याचा चमचा तोंडात धरून जन्मलेल्या माझ्या गुरूदेवांचे आयुष्य प्रचंड खडतर बनले, पण त्यांच्या आज उपलब्ध असलेल्या साहित्यात त्याची वेदना, खेद किंवा खंत कुठेच डोकावत नाही.

मग कशी साधली असेल त्यांनी ही शांतीची स्थिती? मला वाटते की सतत दुसऱ्यांचा, सतत रंजल्यागांजल्यांचा विचार केल्यामुळे त्यांच्या मनातून व्यक्तिगत दुःख कायमचे नाहीसे झाले असावे. त्यांना मी आणि माझे राहीलेच नाही. **रामकृष्ण परमहंस म्हणतात, 'मी व माझे यांचे भले व्हावे यासाठी प्रयत्न करणे ही 'माया' आणि ज्यांचा आपल्याशी संबंध नाही अशांच्या भल्यासाठी प्रयत्न करणे ही 'दया'. माया माणसाला बंधनात अडकवते तर दया माणसाला मुक्तीपथावर नेते!' संत तुकारामदेखील म्हणतात, 'जे का रंजले गांजले। त्यासि म्हणे जो आपुले। तोचि साधू ओळखावा। देव तेथेचि जाणावा।।'**

अजूनपर्यंत मी तुम्हाला माझ्या गुरूदेवांचे नाव सांगितले नाही. मी तुम्हाला त्यांचे नाव सांगितले तर मी त्यांना माझे अध्यात्मिक गुरू म्हटले यावर विश्वास बसणार नाही. कारण, ते अध्यात्मिक गुरू म्हणून प्रसिद्ध नव्हतेच मुळी. तुम्हीही त्यांना ओळखता, पण एक क्रांतिकारक म्हणून. सेंट्रल असेंब्लीत बॉंब फेकणारे आणि सॉन्डर्सचा वध करणारे म्हणून. तुम्ही त्यांचाकडून देशभक्तीची प्रेरणा घेत असाल. त्यांच्या शौर्याच्या रोमहर्षक कथा वाचून तुमचे रक्त सळसळले असेल. पण मी त्यांना गुरू म्हणून स्विकारले, ते त्यांच्या जीवनातील रोमहर्षक प्रसंगांमुळे नव्हे. मी त्यांचा जो गुरू म्हणून स्विकार केला तो त्यांच्या साहित्याच्या वाचनाने. यालाच मी 'ग्रंथसाक्षात्कार' म्हणतो. त्यांच्या लेखांनी मला माझी जूनी गृहीतके तपासायला भाग पाडले. त्यांनी नवसाला पावणारा, स्तुतीने खुश होणारा, कठोर न्याय करणारा, मंत्रांनी कामाला लावता येणारा देव नाकारला. जर तुमच्या पुजापाठांनी आणि मंत्रोच्चारांनी देव तुमच्या मनोकामना पूर्ण करत असेल तर तो सर्वशक्तिमान कसा असेल?

देवाची ही संकल्पना कमकुवत मनाचा काल्पनिक आधार आहे असे ते लिहितात. आणि हे त्यांनी केव्हा लिहीले? ते तुरुंगात असताना, त्यांना मृत्यूदंडाची शिक्षा जाहीर झाली असताना. थोडा विचार करा, आम्हा सामान्य माणसांना देव सर्वात तीव्रपणे केव्हा आठवतो? जेव्हा आम्ही संकटात असतो तेव्हा. आणि भगतसिंग देव केव्हा नाकारत आहेत? जेव्हा त्यांचा मृत्यू निश्चित झालाय, मृत्यूची तारीख ठरली आहे तेव्हा. त्यांना अशावेळेस तीव्रपणे देवाचा धावा करावासा वाटणे स्वाभाविक झाले असते. पण ते तो करत नाहीत. उलट दयेचा अर्ज करू पहाणाऱ्या आपल्या वडीलांना ते खडे बोल सुनावतात.

भगतसिंगांचे असे मृत्यूला सामोरे जाणे प्रत्यक्ष रणभूमीवर

आवेशात उडी घेण्यासारखे नाही. हे जपानी पायलटांसारखे हाराकीरी करणे नाही. हा 'स्थिरबुद्धी'ने घेतलेला निर्णय आहे. याचा विचार करता, त्यांच्या उन्नत मानसापुढे मान झुकवल्याशिवाय मला पर्याय नव्हता. त्यांच्या निबंधात त्यांनी काही प्रश्न उपस्थित केले होते. त्यांची उत्तरे माझ्या मनाला देता आली नाहीत. काहीतरी थातूरमातूर उत्तरे देऊन मी त्यांचे मुद्दे कदाचित निकाली काढूही शकलो असतो. पण त्यांच्या 'स्थितप्रज्ञ' व्यक्तीमत्वामुळे मला तसे करण्याचे धाडस झाले नाही. जर परमेश्वर आनंदस्वरूप आहे, तर तो जगात दुःख निर्माणच का करतो? तो परमपिता आपल्या मुलांना संकटापासून वाचवत का नाही? पापी लोकांना पाप करण्यापासून थांबवत का नाही? त्याची ती लीला आहे म्हणून मला सांगू नका. कारण मग आपल्या मुलांना दुःखात लोटून लीला करणाऱ्या तुमच्या देवात आणि रोमला आग लावून फिडेल वाजवत बसणाऱ्या सम्राट नीरोत काय फरक राहील? तुमचा परमेश्वर परीक्षा घेतो म्हणाल तर दीडदोन वर्षाचे काहीही कळत नसलेले मूल उपासमारीने मरते तेव्हा, तो त्याची कोणती परीक्षा घेत असतो? ज्याची परीक्षा घेतली जातेय, त्याला कळायला तर हवे ना. भगतसिंगांच्या या प्रश्नांची उत्तरे मी देऊ शकलो नाही.

**भगतसिंगांच्या मृत्यूची तारीख निश्चित झाली होती. २४ मार्च १९३१ ला त्यांना फाशी दिले जाणार होते. तथापि आदल्या दिवशी संध्याकाळीच त्यांना फाशी देण्याचा हुकूम जेलरला आला. जेलर जेव्हा त्यांना फाशीच्या तक्ताकडे नेण्यासाठी त्यांच्या कोठडीत पोचला तेव्हा त्याला दिसले की भगतसिंग एक पुस्तक वाचत आहेत. ते रशियन क्रांतिकारक लेनीन यांचे 'शासन संस्था आणि क्रांती' हे पुस्तक वाचत होते. तुम्ही किंवा मी त्यांच्याजागी असतो तर फाशीच्या आदल्या दिवशी असे एखादे पुस्तक वाचू शकलो असतो काय? 'स्थितप्रज्ञ' अवस्था गाठल्याशिवाय हे शक्यच नाही.**

आज आम्ही त्यांचा उदोउदो करतो. पण त्यांच्या काळात किती लोकांपर्यंत त्यांचं बलिदान कळलं असेल? किती लोकांनी त्यांचं कौतुक केलं असेल? आणि मृत्यूची किंमत चुकवून कोण माणूस अशी प्रतिष्ठा मिळवण्याचा प्रयत्न करील? त्यामुळे प्रतिष्ठेचं, नावलौकिकाचं प्रलोभन त्यांच्यापुढे नव्हतंच कधी हे साहजिक आहे. उलट ते म्हणतात, एवढ्या छोट्याशा आयुष्यात इन्कलाब झिंदाबाद ही घोषणा देशाच्या कानाकोपऱ्यात पोचवली हीच या जीवनाला खूप मोठी किंमत मिळाली.

त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना उद्देशून लिहीले, माझ्या गळ्याभोवती ज्या क्षणी फास आवळला जाईल, त्याचक्षणी मी या कटकटीतून सुटेन, पण तुम्हाला खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. तुमचा संघर्ष अधिक खडतर असणार आहे!

ते आणखी एका ठिकाणी लिहीतात, क्रांती म्हणजे बाँब आणि बंदूकांचा संप्रदाय नव्हे. आम्ही 'क्रांती' या शब्दाला पवित्र मानतो. माणसाचे माणसाकडून होणारे शोषण थांबवणे म्हणजे क्रांती! त्यांच्या या वाक्याने मला आणखी एकदा हादरविले. कारण त्याआधी माझी अशी धारणा होती की क्रांती म्हणजे सशस्त्र संघर्ष, क्रांती म्हणजे परकीय सत्ताधाऱ्यांना सशस्त्र उठाव करून घालवून देणे. आपल्या देशावर आपल्याच लोकांचे राज्य असावे यासाठी शस्त्र हाती धरणे. पण भगतसिंग क्रांतीची पार वेगळी व्याख्या सांगत होते. 'माणसाने माणसाचे चालवलेले शोषण थांबवणे म्हणजे क्रांत!' ते रोकडा प्रश्न विचारत होते, लॉर्ड आयर्नविनच्या जागी तेज बहादुर सप्रू जाऊन बसले म्हणून काय फरक पडणार? त्यांच्या काळात कदाचित माझ्यासारख्या सामान्य जनतेला त्यांना काय म्हणायचे होते ते लक्षात आले नसेल. पण आज त्यांना काय म्हणायचे होते ते अनुभवाने आपल्या लक्षात येतेय. राज्यकर्त्या माणसांचा रंग, वंश, धर्म बदलून काहीही फरक पडत नाही.

**त्यामुळेच ब्रिटिश वंशाच्या सॉन्डर्सवर पिस्तूल चालवणारे भगतसिंग अस्पृश्यतेच्या प्रश्नांवर लिहितात. अस्पृश्याकडून जाहीरपणे हार घालून घेणारे नेते त्यानंतर स्वतःच्या घरात प्रवेश करण्यापूर्वी नेसत्या वस्त्रानिशी स्नान करतात, यातील पाखंड ते मांडतात. आपल्याच देशातील, आपल्याच धर्मातील घटकांना आपलेच लोक सामुहिक गुलामीत ठेवतात हे त्यांच्या क्रांतिकारक नजरेतून सुटत नाही. ते साहित्याच्या प्रश्नावर लिहितात, भाषेच्या प्रश्नावर लिहीतात. जगातील वेगवेगळ्या तत्त्वज्ञानांचा अभ्यास करून त्यावर लिहीतात. आयर्लंडच्या मुक्तीलढ्यातील आयरीश क्रांतिकारकाच्या आत्मचरित्राचा अनुवाद करतात.**

**'बहीऱ्यांना ऐकू जाण्यासाठी' म्हणून त्यांनी सेंट्रल असेंब्लीत बाँब फेकला. त्यांना राज्यकर्त्या बहीऱ्यांना काय ऐकवायचे होते? सरकार पास करू इच्छित असलेल्या 'ट्रेड डिस्प्युट बिल' आणि 'पब्लिक सेफ्टी बिल' या बिलांना जनतेचा विरोध आहे, हेच ते सांगत होते. ट्रेड डिस्प्युट बिल कामगारांच्या हक्कांवर गदा आणत होते. कामगारांना वाटेल तसे पिळून घ्यायला भांडवलदारांना खुला परवाना देण्यासाठीच हे बिल होते.**

शोषित अन्यायग्रस्त समाज प्रतिक्षिप्त क्रियेसारखा बंड करून उठत असतो. पण त्याच्या बाजूने युद्धात उतरणाऱ्याला मात्र जाणीवपूर्वक उतरावे लागते. गीता म्हणते,

**'गुंतूनि करिती अज्ञ ज्ञात्याने मोकळेपणे।**
**करावे कर्म तैसे चि इच्छुनि लोकसंग्रह।**

**भगतसिंग कष्टकरी कामगार शेतकऱ्यांच्या बाजूने धर्म युद्धात उतरले होते.**

भगतसिंगांना कामगारांचं, शेतकऱ्यांचं, अस्पृश्यांचं दुःख स्वतःचं वाटत होतं. हीच सर्वव्यापित्वाची अनुभूती होती.

खरं तर वर उल्लेख केल्याप्रमाणे त्यांचं घराणं समृद्ध श्रीमंत होतं. त्यांना कशाचीच ददात नव्हती. पण त्यांनी घर सोडून फकिरी पत्करली. कधी एखाद्या पेपरच्या कचेरीत तर कधी एखाद्या झाडाखाली. कित्येक दिवस तर ते अर्धपोटी राहीले. हे संन्यासी जीवन होते!

असेंब्लीत बाँबस्फोट केल्यानंतर त्यांनी स्वतःला अटक करवून घेतली आणि लगेचच त्यांच्या बहुतेक सहकाऱ्यांनादेखील अटक करण्यात आली. जे पकडले गेले नाहीत असे चंद्रशेखर आझाद अल्फ्रेड पार्कमधील चकमकीत हुतात्मे झाले; तर, दुसरे एक साथी भगवतीचरण हातात बाँब फुटून शहीद झाले. त्यांची सगळी संघटना संपल्यासारखी झाली. खरं तर ही निराशा आणणारी स्थिती होती, पण भगतसिंग निराश नव्हते. त्यांचे म्हणणे होते की, जोपर्यंत समाजात शोषण आहे, वर्ग आहेत, तोपर्यंत संघर्ष थांबणार नाहीत. कधीकधी हरायला होईल, सगळे थंडावले असे वाटेल. पण पुन्हा शोषित उसळी मारतील. जगाचा इतिहास हेच तर दाखवत आलाय.

**मृत्यूला हा माणूस अक्षरशः हसत सामोरा गेला. थोडंसंच आयुष्य जगला, पण रसरसून जगला. रडगाणी, वैयक्तीक तक्रारी हे त्याच्या मनात औषधापुरतं देखील नव्हतं. गरीब कष्टकऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठीच तो इन्कलाब आणत होता. सर्वांचं दुःख आपलं मानल्यामुळे त्याला स्वतःचं दुःख उरलं नाही.**

**ज्या ज्या वेळी माझं मन निराश होतं, परिस्थितीला शरण जाऊ पहातं, त्या त्या वेळी भगतसिंग माझा आधार बनतात. त्यांची आठवण मला माझ्या प्रत्येक विचलीततेनंतर धर्ममार्गावर यायला प्रवृत्त करते.**

*डॉ. रुपेश पाटकर*

## ''नैतिक मूल्यांची जपवणूक: उल्का महाजन यांनी 'माझा सन्मान' पुरस्कार नाकारला''



'एबीपी माझा' या चॅनलने ''माझा सन्मान'' या पुरस्कारासाठी ज्यांची निवड केली होती, त्या आदरणीय उल्का महाजन यांनी हा पुरस्कार नाकारला आणि हा पुरस्कार नाकारते वेळी....

आदरणीय उल्का महाजन यांनी एबीपी माझाला जे कारण कळवलं, ते कारण अत्यंत महत्त्वाचं आणि एखादा पुरस्कार मिळावा म्हणून लाळघोटेपणा करणाऱ्या सर्वांनी आदर्श घ्यावा, अशा प्रकारचं होतं.

उल्का महाजन यांना एबीपी माझाने ''माझा सन्मान'' हा पुरस्कार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते देण्याचं ठरवलं होतं.

हा पुरस्कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उप-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दिला जाणार आहे, हे आदरणीय उल्का महाजन यांना ज्यावेळी समजलं, त्यावेळेला उल्का महाजन यांनी पुरस्कार घोषित करणाऱ्या एबीपी माझा या न्यूज चॅनलला खालील उत्तर देत कळवलं की....

**''ज्या पद्धतीने मतदारांचा, लोकशाहीचा व संविधानाचा मान न राखता हे विद्यमान सरकार भ्रष्टाचाराच्या आधारे सत्तेवर आले आहे. त्या पार्श्वभूमीवर अशा व्यक्तींच्या हस्ते (ते संविधानिक पदावर असले तरीही) सन्मान स्वीकारणे माझ्या सद्सद्विवेकबुद्धीला पटणारे नाही. म्हणून सदर सन्मान मी नम्रपणे नाकारत आहे!''**

*(समाजमाध्यमातून साभार...)*

‘‘दै. ‘लोकमत’मधली ही बातमी...म्हणजे, हळूहळू ‘कंत्राटी–कामगार पद्धती’चं जहर, हा ‘गोदी–मिडीया’, कसा अलगदपणे हतवीर्य व हतबुद्ध झालेल्या आजच्या नवतरुणाईच्या रक्तात सापाच्या विषासारखं भिनवू पहातोय, त्याचं जहरीलं दिग्दर्शन आहे...कारण, बहुतांश ‘मिडीया’देखील या दुर्दैवी कंत्राटी–जीवांच्याच टोकाच्या शोषणावर जगतोय, ही अस्वस्थ करणारी वस्तुस्थिती आहे! बातमीचा एकूण ‘बाज’च असा आहे की, ‘‘कंत्राटी–कामगार पद्धतीचा मूळ महारोग तसाच फसफसू देत रहायचं; पण, देशातल्या तरुणाईकडून त्याविरोधात ‘नक्षलवादी–पॅटर्न’सारखा संतप्त उद्रेक व्हायला नको म्हणून, वरकरणी रोगावर ‘इलाज’ केला जात असल्यासारखं त्यांना बेमालूम भासवायचं...’’ “But, for sure, there NO LIGHT at the end of the tunnel for this young generation and generations to come, unless the "slavery' and "neo-untouchability' ingrained in the ‘Contract-Labour System' is annihilated...!!!”

*...राजन राजे*

# कंत्राटी वीज कर्मचाऱ्यांना पावला बाप्पा

## १९ टक्के मूळ वेतनवाढ; इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात सर्वाधिक वेतन

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मुंबई :** महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या वीज कंपन्यांमधील कंत्राटी कामगारांच्या मूळ वेतनात १९ टक्के वाढ करण्यात येत असल्याची घोषणा ऊर्जामंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ही वाढ मार्च २०२४ पासून लागू केली आहे.

याचा फायदा ४५ हजार कामगारांना होणार आहे. इतर राज्यातील कंत्राटी वीज कामगारांपेक्षा महाराष्ट्रात अधिक मूळ वेतन देण्यात आले आहे. याशिवाय, या कंत्राटी कामगारांना पाच लाखापर्यंत आरोग्य विमा सुविधा लागू करण्याचा निर्णयही फडणवीस यांनी घेतला.

### स्वतंत्र वेतनसूचीही

कंत्राटी वीज कामगारांसाठी स्वतंत्र वेतनसूची तयार करणे व तिन्ही वीज कंपन्यांच्या नवीन भरतीत कंत्राटी कामगारांना वयोमर्यादेत सूट देण्याचा निर्णय सह्याद्रीवरील बैठकीत झाल्याची माहिती महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनने दिली.

# ‘‘पाणीपुरीचा प्रश्न: आरोग्य आणि उपजीविकेचा संघर्ष’’

टी. चंद्रशेखर ठाणे महापालिका आयुक्त असताना त्यांनी तलावपाळी, स्टेशनवरच्या फेरीवाल्यांना हटवणे, अनधिकृत बांधकामे पाडणे वगैरे करत ठाणे सुंदर बनवायचा प्रयत्न सुरू केला होता. त्या काळात मी ‘आज दिनांक’ची ठाणे प्रतिनिधी म्हणून फोटोग्राफीचं काम बघत होते. त्या अनुषंगाने रोजच त्यांची भेट व्हायची. एकदा त्यांच्या दालनात बसून गप्पा मारत असताना, मी तळ्यावरच्या पाणीपुरीवाल्यांना हाकलल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. सोपान बोंगाणे, अशोक नेर्लेकर वगैरे जेष्ठ पत्रकार पण होते. चंद्रशेखर यांनी हसत हसत सांगितल की, उद्या संध्याकाळी माझ्या घरी ये आणि तुझी फेवरेट पाणीपुरी कुठे मिळते, तिकडे माझ्या पत्नीला पण घेऊन जा. पण, माझ्यासाठी एक स्टोरी कर. सकाळी ठाणे सिव्हिल हॉस्पिटलमध्ये जा आणि त्यांच्या ओपीडी (OPD) मधल्या त्वचा रोगाच्या पेशंटना भेट, त्यांच्या समस्या जाणून फोटो काढ आणि लिहा त्यावर. मग, संध्याकाळी पाणीपुरीची पार्टी माझ्याकडून!

दुसऱ्या दिवशी मी आणि आमचा वार्ताहर अरुण मुरकर तिथे गेलो. मुख्य चिकित्सा अधिकाऱ्यांना भेटलो आणि त्यांच्याच बरोबर ओपीडी (OPD) मध्ये आलो. त्या तीन तासात मी जे काही बघितलं, ते आयुष्यभर विसरणार नाही. ९९% हाताचे त्वचा रोगी हे पाणीपुरीवाले होते. जे केमिकल पाण्याची चव वाढवण्यासाठी टाकतात, त्यामुळे त्यांची त्वचा जळते आणि गळायला लागते. हातात किडे पडतात. पण, पापी पेट का सवाल म्हणत ते काम करत रहातात. त्यांच्या हातानी ते इंफेक्शन पाण्यात जातं. त्या वेळी त्या रोग्यांकडून मी जे काही ऐकलं, त्यांच्या हातांची जी अवस्था बघितली, त्यानंतर माझी रस्त्यावर पाणीपुरी खाण्याची हिम्मत झाली नाही. सेम कंडीशन रस्त्यावरच्या लिंबू सरबत, गोळा वगैरे वाल्यांची होती, पाणी कुठलंही वापरायचं, कारण स्विटनरनी चव बदलते. गोडवा आणायला हॉस्पिटलमधून एक्षीश झालेले सलाईन वापरायचे. ते स्वस्त पडतात म्हणून! आता कायदे कडक झाल्यावर हे कमी झालं असेल, पण बंद होणं शक्य नाही. माझी मोठी नणंद सरकारी डॉक्टर आहे. तिने सांगितलं होतं की, पूर्वी युपीमधल्या सरकारी हॉस्पिटलमध्ये mortuary मध्ये AC तेवढे चांगले नसायचे. तेव्हा प्रेते ठेवायला बर्फाच्या लाद्या वापरल्या जायच्या. दररोज रात्री काही लोक त्या वापरलेल्या लाद्या घेऊन जायला ठेले/हातगाड्या घेऊन यायचे आणि नंतर नेऊन विकायचे. तो बर्फ हे गोळा वाले, लिंबू सरबतवाले विकत घेऊन जायचे.

*(समाजमाध्यमातून साभार...)*



## लोकसत्तेतील ‘चतुरंग’ पुरवणीमधील डॉ. प्रज्ञा दया पवार लिखित भित्यंतराचे कल्लोळ या लेखातील महत्त्वाचा अंश...

एकदा मी दक्षिण मुंबईत कोणत्या तरी कामासाठी गेले होते. सोबत माझा मुलगा, प्रतीक होता. कार काहीशी लांब पार्क केली होती, म्हणून तो ती आणायला गेला. परतायला माझ्या अपेक्षेहूनही बराच वेळ लागला त्याला. तेवढ्या वेळेत एक–दोघांनी मला न्याहाळत ‘आती क्या?’, ‘कितना रेट?’ वगैरे चाचपणी करायला सुरुवात केली. माझ्या लेकाएवढ्या वयाचा एकजण माझ्याभोवती दोनदा गिरकी मारून गेला.

तेवढ्यात प्रतीक दिसला. पलीकडून जोरजोरात हॉर्न वाजवून ‘‘मम्मी मम्मी’’ अशा हाका मारत ‘‘क्रॉस करून ये’’, असं सांगत होता. तत्क्षणी मी धावत सुटले. ‘‘तुला इतका वेळ का लागला?’’ हा प्रश्न मी त्याला सारखा विचारत राहिले. खूप रागावले त्याच्यावर. त्याला कळेना, अचानक मम्मीला झालं तरी काय?

मला खूपच अस्वस्थ वाटायला लागलं. मी खूप विचित्र कपडे घातलेत का? असं काय दिसलं त्या पुरुषांना की त्यांना मी ‘तसली’ वाटले? घरी आल्यावर आरशासमोर उभं राहून मी स्वत:ला कधी नव्हे, इतक्या वेळा न्याहाळलं. तशा तर अजिबातच दिसत नाही आपण, असं स्वत:ला समजावलं मी आणि समजावता समजावताच मला माझीच भयंकर लाज वाटू लागली. हा मध्यमवर्गीय किडा कधी चावला आपल्याला? स्वत:च्याच थोबाडात मारून घेतलं त्या रात्री. होय, मला मध्यमवर्गीय होण्याची अतोनात भीती वाटते. त्या जाणिवांच्या सापळ्यात स्वत:ला अडकू न देण्याची शिकस्त करत राहते मी. कधी जमतं तर कधी कधी त्या रात्रीसारख्या फटी राहतात. वर्गांतराची स्वाभाविक आस बूर्ज्वा वर्गीय नॉर्म्समध्ये बदलू नये यासाठी ‘पापणी ठेवीन जागी’ ही प्रतिज्ञा स्वत:शीच वारंवार घ्यावी लागते आताशा. विश्वातल्या प्रत्येक बाईचे असेच असावेत डोळे वेश्येसारखे–विश्वाचं रहस्य समजून चुकलेले!

माझ्याच एका कवितेत लिहिलेल्या या ओळी मला खाडकन् भानावर आणतात. खरं सांगायचं, तर भित्यंतराच्या कल्लोळाला कचकचीत टाचणी लावतात.

*(समाजमाध्यमातून साभार...)*

# चार महत्त्वपूर्ण बातम्या...आणि, त्यातील ‘भांडवली-व्यवस्थे’च्या उच्छृंखल-उन्मत्त, नीच-नृशंस, हिडीस-विकृत अंतरंगाचा ‘समान धागा’...!!!

**बातमी क्र. १.... ‘‘रामजन्मभूमी संकुलात साफसफाईचे काम करणाऱ्या २० वर्षीय मुलीचं अपहरण करुन सामूहिक बलात्कार!’’**

(अर्थातच, ‘गोदी-मिडिया’तून ही बातमी गायब आहे किंवा अगदीच त्रोटक स्वरुपात कुठल्यातरी कोपऱ्यात पडून आहे)

‘रावणां’नी राजकीय लाभ मिळवण्याच्या व गुजराथी-भाषिक भांडवलदारवर्गाला ‘अतिस्वस्त मजूर’ (Cheap and Flexible Labour) उपलब्ध असलेल्या उत्तर प्रदेशच्या



‘सुपीक’ जमिनीत ‘चंचुप्रवेश’ मिळवू देण्याच्या (त्याकामी, अमिताभ बच्चनसारखे ‘सेलेब्रिटी’ दलाल म्हणून याअगोदरच. अयोध्या-परिसरात जाहिरातबाजीतून वापरले जाताहेत व सगळी मलिदा देणारी मलईदार कंत्राटं प्रामुख्याने गुजराथ्यांना; फक्त, ‘कंत्राटी-कामगार’ नावाचे ‘गुलाम’ उत्तरभारतीय) अंत:स्थ हेतूने प्रेरित होऊन बांधलेल्या राममंदिर-परिसरात, अशासारख्या घटना घडणं, घडत रहाणं...हा अपवाद असणार नाही!

गुजराथ्यांच्या वाढत्या कुप्रभावाला स्थानिक सर्वसामान्य उत्तरभारतीय ‘‘अयोध्या में किसानों को हिरासत और अरबपतीयों को राहत’’, असं म्हणतायत!


**बातमी क्र. २ .... ‘‘इलियॉन मस्कच्या ‘स्पेसएक्स’ कंपनीच्या ‘पोलरिस-डॉन’ या खाजगी अंतराळ मोहिमेअंतर्गत फाल्कन-९ रॉकेटने ‘जेरेड आयझेकमन’ हा इलियॉन मस्कसारखाच ‘सणकी-विक्षिप्त’ असलेला अमेरिकन अब्जोपती (Tech Expert) अंतराळात पृथ्वीपासून १४०० कि.मी. अंतरावर (Earth's Van -llen radiation belts) जाऊन आला!’’**

अमेरिकन ‘फेडरल-रिझर्व्ह’तर्फे अमेरिकन धनसंपदा व कमाई याचं विश्लेषण केलं गेल्यानंतर, अनेक धक्कादायक निष्कर्ष हाती लागले...वरच्या १% वर्गाकडे देशाची ४०% धनसंपदा एकत्रित झालेली दिसते; तर, ज्याला ‘मेडियन-



इन्कम’ म्हणतात (५०% जास्त वरच्या भागात आणि ५०% कमी खालच्या भागात असलेलं) ते गेल्या पंधरावीस वर्षांपूर्वी होतं, त्यापेक्षाही कमी भरलं. या पाशवी अमेरिकन भांडवली-व्यवस्थेचं व्यवच्छेदक लक्षण असलेल्या ‘आर्थिक-विषमते’नं घातलेला हा धुमाकूळ आहे...या असल्या अतिश्रीमंतांकडे एवढा पैसा जमा आहे की, तो कुठे खर्च करायचा, या विवंचनेनं ते पछाडले गेल्यामुळेच अशा विक्षिप्त कृती त्यांच्या हातून तेव्हा होतायत; जेव्हा, पृथ्वीवर अवघी सजीवसृष्टी सहजी संपुष्टात आणू शकण्याची विध्वंसक क्षमता बाळगणारी ‘पर्यावरणीय-महासंकटं’ दत्त म्हणत उभी ठाकलीयत!

**बातमी क्र. ३ ..... ‘‘हिंडेंनबर्ग-अहवाल आणि ‘सेबी’ चेअरमन माधवी-बूच प्रकरण-प्रसिद्ध गौतम अदानीच्या ‘अदानी-पॉवर’ कंपनीला महाराष्ट्र-सरकारतर्फे ६,६०० मेगावॅट वीज पुरवठ्याचे कंत्राट!’’**



२.७० रु. प्रति युनिट दराने सौरऊर्जा पुरवण्यासोबतच औष्णिक विजेचे दर ‘कोळशाच्या किमतीच्या आधारे’ निर्धारित (कोळसा कोणाचा...तर, गौतम अदानीचाच) केले जाणार आहेत, याचाच अर्थ अदानी-पॉवर या ‘भाजप शासनमित्र’ (जसा, ‘पोलिसमित्र’ असतो, तसाच) कंपनीला, हे असे कंत्राट ‘बहाल’ केले गेले असल्याने वीजग्राहकांनी आपली भरमसाठ लूट होण्याच्या परिस्थितीला तोंड देण्यास तयार रहावे, हे उत्तम!

**बातमी क्र. ४ .... ‘‘रोह्याच्या नायट्रोकेम कंपनीतील स्फोटात गंभीर जखमी झालेल्या चौथ्या कामगाराचा मृत्यू!’’**

अलिकडच्या काळात एकापाठोपाठ एक झालेल्या असंख्य औद्योगिक अपघातात, शेकडो कामगार किड्यामुंग्यांसारखे भाजून, चिरडून, छिन्नभिन्न होऊन मरत आलेत...मरणारे सगळे अर्थातच ‘कंत्राटी-कामगार’ नावाचे ‘गुलाम’ (ज्यांच्या जगण्यामरण्याला काडी इतकीही किंमत या ‘भांडवली-व्यवस्थे’त नसतेच) आणि बहुतेक महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात खोलवर घुसलेले सगळेच उत्तर भारतीय कामगार असतात.



...कुठल्याही अशा दुर्घटनेत कंपनी मालक, व्यवस्थापक यांच्यावर ‘मनुष्यवधा’सारखी आणि ज्यांना, नियमितपणे कंपन्यांकडून ‘पैशाची जाड पाकिटं लाच’ म्हणून मिळत असतात; अशा, संबंधित सरकारी अधिकाऱ्यांवर कामात भ्रष्टाचार, बेजबाबदारपणा, बेपर्वाई, दुर्लक्ष केल्याबद्दल... प्रामाणिकपणे गंभीर कायदेशीर कारवाई झाल्याचं, एकही उदाहरण या ‘रक्तपिपासू-निर्मम-शोषक’ भांडवली-व्यवस्थे’त (Vampire-State System) उपलब्ध नाहीच!

भांडवलशाहीचं, अमानुष-घृणास्पद ‘आर्थिक-विषमता’ व महाविध्वंसक निसर्ग-पर्यावरणीय आघात...हे व्यवच्छेदक लक्षण होय! ‘आर्थिक-असमानता’, ही ‘लोकशाही व न्यायदान प्रक्रिये’वर संक्रांत आणते. ‘‘आर्थिक-विषमतेतून राजकीय-विषमता जन्माला येते; आणि, पुन्हा राजकीय-विषमता, ही आर्थिक-विषमतेलाच कारणीभूत ठरते’’ असं एक दुष्टचक्र चालूच रहातं...त्यातून, एकूणच ‘लोकशाही-प्रक्रिये’ला असं काही एक ग्रहण लागतं की, आजची बहुतांश अमेरिकन तरुणपिढी (जवळपास ८०%) मतदानाचा त्रास घेण्यास का कू करु लागली आहे; कारण, त्या तरुणाईचं मत आहे की, ‘‘रिपब्लिकन जिंको वा डेमोक्रॅट्स जिंको... जिंकणार शेवटी ‘वॉल स्ट्रीट’च... आपल्याकडे तर, याहीपेक्षा भीषण परिस्थिती मोदी-शाह यांच्या रासवट राजवटीत उभी राह्यलीय...पण, ती समजण्या-जाणवण्याएवढे आम्ही ‘जागे’ थोडेच आहोत? आमचं हिंदू-मुस्लिम, आमचं मस्जिद-मंदिर असंच चालू राहू द्या...नका मोडूत आमची झोप, ती ‘काळझोप’ असली तरीही!’’

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**